शनिवार । १७ नोव्हेंबर १९७९ । ७५ पैसे

# माणूस

पृष्ठ ९ वरील खास लेख....






शिवाय.... **पुण्यातील दलित साहित्य संमेलन**

# सप्रेम नमस्कार



□ तुमचा १० नोव्हेंबरचा अंक आताच वाचला. श्री. द. वि. पोतनीस, 'मद्रास' यांनी 'सप्रेम नमस्कार' या सदरातील पत्रात एका शाळामास्तरच्या हिमालय-मालेचा उल्लेख केला आहे.

त्या मास्तरांचे आडनाव 'काळे' असे होते. (आद्याक्षरे आठवत नाहीत.) ते नू. म. वि.त आम्हाला मास्तर होते. त्यांनी पायी हिमालययात्रा केली होती. चित्रमयजगतमध्ये ते फार सुंदर प्रवासवर्णने लिहीत. श्री. पोतनीस यांनी त्यांचा उल्लेख केल्याचे पाहून गंमत वाटली.

श्री. काळे हे (बहुधा) अविवाहित होते. व फावल्या वेळी विमाएजंटाचा धंदा करीत.

९ नोव्हेंबर, ७१ **श्री. ज. जोशी**, पुणे

□ १९७५ च्या दसऱ्याच्या सुमारास आपण, ऐन आणीबाणीतही 'आज प्रकर्षाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संचलनाची आठवण होत आहे असे मोठ्या धैर्याने लिहिले होते. आज १९७९ मध्येही त्याच धैर्याने नि आत्मविश्वासाने आणि पुन: ठाम आपण संघ, हिंदुत्व, भारतीयत्व आदी विषयाची चर्चा (दिवाळी अंकात) केलेली आहे. आपले किती आभार मानू ? या दोन्ही लेखांबद्दल मनःपूर्वक अभिनंदन.

**सु. ह. जोशी**

९ नोव्हेंबर ७९ शिरूर–घोडनदी

□ आपला सर्वांगसुंदर दिवाळी अंक मिळाला. त्यामधील सौ. मीरा गव्हाण-करांच्या एक होता कार्व्हर या लेखाचे कौतुक करावे तेवढे थोडेच. लेखाची सुरुवात; शेवट, भाषाशैली, मांडणी या सर्वांचे वर्णन एकाच शब्दात करणेचे झाल्यास 'अत्युत्तम' हाच तो शब्द. हा 'छुपा रुस्तुम' तुम्ही उजेडात आणलात याबद्दल तुम्हासही धन्यवाद. याच लेखिकेकडून असेच निरनिराळ्या विषयाचे लेख घेऊन ते प्रसिद्धीस द्यावेत अशी नम्र विनंती आहे. कार्व्हरवरचे हे छोटे पुस्तक छापून ते प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहचले पाहिजे.

**बा. श्री. दीक्षित**

८ नोव्हेंबर ७९ भद्रावती (कर्नाटक स्टेट)

□ आपला या वेळचा 'माणूस'चा दिवाळी अंक वाचला. आवडला. गेल्या वर्षाचा अंक सर्व दृष्टीने अधिक चांगला होता. तरीदेखील या अंकातील काही लेख मला खरोखर आवडले.

श्री. विनय हर्डीकर यांचा 'लोकशाहीतून प्रजाप्रभुत्वाकडे' हा लेख, हिमहंसीची कथा आणि सौ. वीणा गवाणकर यांनी लिहिलेलं 'एक होता कार्व्हर' हे चरित्र मला खूप आवडलं. हे चरित्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध व्हावं असं वाटतं. कार्व्हरचं थक्क करून सोडणारं आयुष्य आणि सौ. गवाणकर यांची साधी, सोपी, कथनात्मक लेखनपद्धती यामुळे ते चरित्र खूपच लक्षणीय झालं आहे. हे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्यास ते अधिकाधिक वाचकापर्यंत पोचेल, त्याला अधिकाधिक दाद मिळेल आणि न जाणो, एखादा सुप्त शास्त्रज्ञ जागा होऊन यापासून स्फूर्ती घेईल. अशा एखाद्या कार्व्हरची आपल्या देशाला नितांत गरज आहे.

**शिरीन हेरवाडकर**

२ नोव्हेंबर ७९ मुंबई


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : पंचविसावा
१७ नोव्हेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# पुणे वार्ता

## ' हल्लीचे मराठी साहित्यिक भंपक आहेत '...
—रावसाहेब कसबे

## दलित बांधवांना माझे सांगणे आहे की " तुम्हाला आणखी अभ्यास करायला हवा. साधना हवी."
—प्रा. गं. बा. सरदार

सतीश कामत
राजा दीक्षित

शनिवार ता. १० नोव्हेंबर ! संध्याकाळी पाच—सव्वापाचची वेळ. पुण्यातल्या क्वार्टर गेटाजवळच्या अहिल्याश्रमाचं आवार. दारातच कमान उभारलेली. कमानीवर कापडी फलक लावलेला. ' दलित साहित्य संसद : बालन्ना निमल प्रवेशद्वार. ' आत गेल्यावर डाव्या हाताला श्रीविद्या प्रकाशनचं मोठं बॅनर. दलित साहित्यावरील विविध पुस्तकांचं छोटंसं प्रदर्शनच मांडलेलं. अनेकजण पुस्तक पाहतायत, चाळतायत, काहीजण विकतही घेतायत. संसदेचे संयोजक मुरलीधर जाधव यांची धावपळ चाललेली. हळूहळू मंडळी जमताहेत. परस्परांची ओळख होत्येय जुन्या ओळखी दृढ केल्या जातायत. नवीन जोडल्या जातायत. एव्हाना डॉ. भालचंद्र फडके, श्री. ज. जोशी, बाबा आढाव, बाबुराव बागुल, ग. वा. बेहरे इत्यादींनी हजेरी लावलेली. मोहन धारियाही येतात. ठेवणीतलं हास्य, ठेवणीतला नमस्कार. एक रिक्षा आत शिरते आणि सगळ्यांचं लक्ष वेधून घेते. रिक्षातून पु. ल. देशपांडे उतरत असतात. पाय दुखत असल्याचे भाव चेहऱ्यावरही दिसत असतात. दोनच दिवसापूर्वी षष्ठ्यब्दी झाल्यामुळे ज्याच्या त्याच्या तोंडी असलेलं नाव.

सभामंडपाला ' क्रांतिवीर महात्मा फुलेनगर ' असं नाव दिलेलं पु. ल. मंडपात शिरतात. मागोमाग पंधरा—वीस जणांचा घोळका. धारियाही त्यातच. पु. ल. बसतात. समोर बाबा आढाव, इतरही काहीजण. गप्पा सुरू होतात. कार्यक्रम साडेपाचला सुरू होणार असतो. पण पु. लं. च्या भोवती बसलेल्यांना ती वेळ टळून गेल्याचंही भान नसतं. मोहन धारिया पुलंच्या मागेच बसलेले. पण पुलंचं त्यांच्याकडे फारसं लक्ष नसतं. कदाचित मुद्दामच देत नसावेत. कदाचित आम्हालाच तसं वाटत असेल. कारण दोन-तीन दिवसांपूर्वीच असं कळलं होतं की, धारियांनी जेव्हा पुलंच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली तेव्हा धारिया जनता पक्षातून बाहेर पडल्याबद्दल पुलंनी त्यांच्याजवळ स्पष्ट नाराजी व्यक्त केली होती. धारियांना त्यांच्या या निर्णयाबद्दल स्पष्टीकरण विचारलं होतं आणि धारिया समाधानकारक उत्तर देऊ शकले नव्हते. हे खरंही असेल, खोटंही. पण आम्हाला तसं ते समजल्यामुळे आज मंडपात आम्ही उगीचच धारिया आणि पुलंच्या क्रिया—प्रतिक्रियांवर लक्ष ठेवून होतो.

सव्वासहा वाजत आले. प्रसिद्ध हिंदी कवी कैफी आझमी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते. दोन दिवस चालणाऱ्या या संसदेचं उद्घाटन करणार होते. पण ते येऊ शकणार नाहीत हे निश्चित झालं आणि संयोजकांनी पुलंना विनंती केली. पु. ल. उठले. त्यांच्या पाठोपाठ बाबा आढाव, रावसाहेब कसबे, बाबुराव बागुल, अर्जुन डांगळे, कवी राजानंद गडपायले इत्यादी मंडळी व्यासपीठावर स्थानापन्न झाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचं नाव व्यासपीठाला दिलेलं. एव्हाना मंडप भरला होता. पाचशेएक मंडळी सहज असावीत. त्यांच्यातच संगीतकार भास्कर चंदावरकर, मीना चंदावरकर, अनिल अवचट, कुमार सप्तर्षी, उल्हास पवार, शांताराम दिवेकर इत्यादी इत्यादी. प्रा. रावसाहेब कसबेंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे व कवी बालन्ना निमल यांच्या व्यासपीठावरील प्रतिमांना हार घातले. मुरलीधर जाधव यांनी प्रास्ताविक केलं आणि लगेचच पु. ल. बोलायला उठले.

' माझ्या वयाला परवाच साठ वर्षं पूर्ण झाली; पण या दलित साहित्य संसदेच्या उद्घाटनाचा मान मला देऊन ही एक अविस्मरणीय भेट माझ्या साठाव्या वर्षी संयोजकांनी मला दिली आहे. दलित साहित्यावर अतोनात प्रेम करणारा मी दलित साहित्याचा चाहता आहे. माझी या साहित्यावद्दलची भूमिका एका कृतज्ञ माणसाची भूमिका आहे. ' नित्य नवा दिस जागृतीचा ' या उक्तीचा मला प्रत्यक्ष अनुभव देण्याचं कार्य या दलित साहित्यानं केलं आहे.

' चिनी भाषेत अशा अर्थाची एक म्हण आहे की, आम्ही एकत्र हसलो आहोत; पण कधी एकत्र रडलो नाही, म्हणून आमची परस्परांशी ओळख आहे; पण स्नेह नाही. हे म्हणण्याचा अर्थ असा की परस्परांची दुःखं जास्त समजल्याने माणसं जवळ येत असतात. दलित साहित्य आपलं दुःख मांडतं; पण ते दुःख मांडत असताना सहानुभूतीची मागणी करणारं हे साहित्य नाही. इथे प्रश्न दयेचा नाही, परिवर्तनाचा आहे. दलितोद्धार म्हणजे दलितांचा उद्धार असं नसून ज्यांनी दलित ही संकल्पना आणली त्यांचा उद्धार असा त्याचा अर्थ आहे, ही कल्पना रुजवण्याचं फार मोठं कार्य दलित साहित्याने केलं आहे. निसर्गाच्या दर्शनानं तुम्हीही सुंदर बनता. या

दलित साहित्यानं माझं मन विशाल केलं, माझं जग हे साहित्य वाचून अधिक व्यापक बनलं.

'दलित साहित्य म्हणजे काय ? हा प्रश्न वारंवार विचारला जातो; पण उत्तर दिलं जात नाही. कारण असं उत्तर सापडतच नाही. 'माझं ऐकावंच लागणार आहे' या समजुतीवर आज दलित साहित्य उभं आहे. रविंद्रनाथ टागोरांनी असं म्हटलं होतं की, इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मनुष्य भेदून आत त्याच्या मनापर्यंत जाऊन पोचणं सगळचात कठीण आहे. म्हणूनच झोपडीतलं दुःख घेऊन जो उद्याचा मनुष्य येणार आहे त्या महाकवीसाठी मी माझं हे सिंहासन रिकामं ठेवलं आहे.

'दलित साहित्य निर्माण करणारी तेजस्वी माणसं एवढ्या मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात निर्माण झाली हे महाराष्ट्राला निश्चितच भूषणावहं आहे. नव्या प्रबोधनाची ही प्रसादचिन्हं आहेत; पण तरी देखील दलित स्त्री जोपर्यंत जिवंत होत नाही तोपर्यंत दलित तरुण खऱ्या अर्थाने जिवंत होणार नाही. हे लक्षात घेऊन स्त्रियांच्या उद्धारासाठीही आपण प्रयत्न केले पाहिजेत.'

पुलंच्या या मधाळ भाषणानंतर 'गीत भीमायन'ची रचना करणारे राजानंद गडपायले यांचा पुलंच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. पुलंनाही जेव्हा सत्काराची शाल देण्यात आली तेव्हा पुल. म्हणाले—

'पुण्यात शाल मिळते, शालजोडीतलेही मिळतात आणि मायेची उब असणाऱ्या शाली फार थोड्या मिळतात, मला ती मिळाली हे माझं भाग्य !'

याच वेळी मराठवाडा दंगलीत मृत्युमुखी पडलेले तात्या जनार्दन मवाडे यांच्या पत्नी श्रीमती ताईबाई मवाडे यांचाही डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते साडी-चोळी देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर बोलताना डॉ. बाबा आढाव म्हणाले, 'साहित्य आणि वेदनेचा संबंध फार जवळचा असतो. साहित्यिक क्रांतीची बीजं पेरत असतो. कारण चाकोरीतलं जगणं हे खऱ्या माणसाचं जगणं नाही. ही चाकोरी मोडण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या साहित्यातून मिळते. म्हणूनच आपण एका रक्ताचे नसू कदाचित; पण एका मूल्याने, एका विचाराने बांधले गेलेले आपण नातेवाईक आहोत.'

बाबा आढावांनंतर प्रसिद्ध दलित साहित्यिक बाबुराव बागुल बोलायला उठले—

'मला पुण्याबद्दल फारसा आदर नाही; पण आज ही दलित साहित्य संसद पुण्यामध्ये घडत आहे, हा निश्चितच आदराचा भाग आहे.

'आज दलित साहित्य जगातील वाङ्मयाच्या अभ्यासकांचा विषय झाला आहे. दलित साहित्यातील चित्रण जगातील अनेक पुरोगामी लेखकांच्या साहित्यात दिसतं. पण त्या साहित्याला त्यांनी दलित साहित्य म्हटलेलं नाही. आम्ही इथली जातिव्यवस्था, इथली वर्णव्यवस्था मान्य करतो. आणि ती नष्ट करण्यासाठी प्रयत्नही करतो. इथलं संस्कृत साहित्य ब्राह्मण, क्षत्रिय, सत्ताधारी वर्ग यांच्यापुरतंच मर्यादित राहिलं. याच समाजाची चरित्रं, युद्ध आणि प्रेमप्रकरणं या संस्कृत साहित्यातून पुनः पुन्हा रंगवण्यात आली. पण इतर कोट्यावधी जनतेला या ठिकाणी स्थान मिळालं नाही.

'आम्ही लोकशाहीचा, ज्ञान-विज्ञानाचा, आधुनिकतेचा पुरस्कार करणारी माणसं आहोत. याच्या उलट हिंदू धर्म ही सर्व पातळ्यांवर विषमतेचा पुरस्कार करणारी व्यवस्था आहे. यातूनच दलित साहित्याची कोंडी करण्याचा कट शिजत आहे. पण आम्ही त्याचा सहज धुव्वा उडवू. कारण पाश्चात्य देशांत दलित साहित्याचा गौरव होत आहे. अशा परिस्थितीत जाती-पातीची ही बंधने तोडून नवा विचार निर्माण करण्याचं काम दलित साहित्याला करायचं आहे.'

प्रा. रावसाहेब कसबे हे नाव यापूर्वीही अनेक वेळा ऐकलेलं. थोडंसं वादग्रस्त. आपण विद्वान, विचारवंत आहोत, असं रावसाहेब स्वतःच भाषणामध्ये वारंवार ठासून सांगत असतात. या दलित-साहित्य-संसदेचे ते अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात रावसाहेब म्हणाले—

'गेली दहा वर्षं मराठी भाषेत चालू असलेल्या दलित चळवळीचे पडसाद आता इतरही भाषांमध्ये उमटू लागले आहेत. कारण सामाजिक प्रक्रियेशी बांधिलकी असणाऱ्यांची ही चळवळ आहे. वेद, उपनिषदे, मनुस्मृती आणि गीता या ग्रंथामध्ये वरिष्ठांनी करून ठेवलेल्या लबाड्यांची चिरफाड करायला आम्ही निघालो आहोत. कारण आमचं या देशावर, या देशातल्या शोषितावर प्रेम आहे. देशातल्या सामान्य माणसाच्या बाजूने उभं राहून त्याला प्रेरणा देणारी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ आहे. आमची बांधिलकी बाबासाहेबांच्या विचाराशी आहे. म. फुल्यांच्या तळमळीशी आहे. या समाजव्यवस्थेत अमूलाग्र परिवर्तन करण्याची प्रेरणा देणारी ही चळवळ आहे.

'या देशातलं सर्व संस्कृत वाङ्मय एका चक्रात अडकलं आहे. कारण इथे तंत्र आधी प्रस्थापित झालं आणि नंतर त्या तंत्राबरहुकूम साहित्याची निर्मिती करण्यात आली. हे ज्याला जमलं तो श्रेष्ठ मानला गेला. जो गीतेवर भाष्य करू शकतो तो श्रेष्ठ मानला गेला. ज्ञानेश्वर, शंकराचार्य, लोकमान्य टिळक, विनोबा भावे यांसारख्या लोकांनी गीतेवर भाष्य केले. कारण त्यांना त्यांच्या विद्वत्तेबद्दल समाजाकडून मान्यता हवी होती. इथल्या संतांनीही व्यावहारिक पातळीवर जातिव्यवस्था मानली होती हेही आपण या संदर्भात विसरता कामा नये.

पृष्ठ २१ वर

दि. बा. मोकाशी

# दत्तो वामनांविषयी....

दत्तो वामन गेले. बाळाजी विश्वनाथ, रंगो बापूजी, नारो शंकर, अशा ऐतिहासिक जोडनावाच्या तोडीला बसायला 'दत्तो वामन' हेही जोडनाव निघून गेले. दत्तो वामन पोतदार गेले हे वाईट झालेच पण शिवकालीन इतिहासातला माझा एक महत्त्वाचा प्रश्न आता निरंतरचा अनुत्तरित राहिला. पोतदारांना तो प्रश्न मी विचारला होता. त्यांनी तो उडवून लावला होता. पण संशोधकांच्या चिकाटीने मी माझ्या विधानाला पूरक असा पुरावा गोळा केला. तो त्यांना नेऊन दाखवावयाचा रोज मी बेत करीत होतो. तोच बातमी आली 'दत्तो वामन' गेले. आता मी गोळा केलेल्या पुराव्याबद्दल मी अवाक्षर बोलणार नाही. ज्या माझ्या विधानाला उत्तर देण्यास ते समोर नाहीत त्याबद्दल मी बोलणे अनुचित होईल. त्यांना माझ्या विधानाला उत्तर देण्याची आता संधी नसल्याने मी माझ्या विधानाप्रित्यर्थ गोळा केलेला पुरावा मागे घेतो.

माझ्या मते असे औचित्य आपण बाळगायला हवे. पण बाळगत नाही. त्या दिवशी संध्याकाळी दत्तो वामन पोतदार यांच्या अंत्यविधिप्रसंगी जी भाषणे झाली त्यात काही महाभागांनी दत्तो वामन पोतदार लिहीत असलेल्या शिवचरित्राचा उल्लेख केला. त्याचे प्रयोजन नव्हते. शिवचरित्राचे काम हाती घेऊन पोतदार स्वतः पुरे करीत नाहीत व आम्हालाही करायला देत नाहीत याचा राग असलेल्या तरुण इतिहास संशोधकांनी जर हा उल्लेख केला असता तर मी काही म्हटले नसते. पण त्यांनीसुद्धा तो कुठे केला नाही.

शनिवार दि. ६–१०–७९ या दिनी पहाटे अडीचच्या सुमारास दत्तो वामन पोतदार यांचे निधन येथील शनिवार वाड्याच्या फुटक्या बुरूजाजवळील त्यांच्या निवासस्थानी झाले. त्याच दिवशी संध्याकाळी सहा वाजून पन्नास मिनिटांनी त्यांच्या पार्थिव देहास अग्नी दिला.

मृत्यूसमयी त्यांचे वय नव्वद वर्षांचे होते. जर दुसरा कुणी या वयात मेला असता तर पोतदार गंमतीनं म्हणाले असते, 'अरे ! याची सेन्च्युरी थोडक्यात हुकली. फलंदाजासारखं आयुष्याचं असतं. आम्ही तरुणपणी एस. पी. च्या मैदानावर क्रिकेट मॅचेस पहायचो. एखादा फलंदाज धावा वाढवता वाढवता पन्नास, साठ, सत्तर, ऐंशी, धावावर यायचा. आता हा शतक करणार असे वाटत असता त्याचा त्रिफळा उडायचा. तसे याचे झाले. यमाने याचा त्रिफळा उडवला.'

पोतदार हे शेवटचे दोन महिने फार आजारी होते. रेडिओवर ही बातमी प्रथम आली. ती ऐकताच आठवले की आपण पोतदारांना दोन अडीच महिन्यात कुठे पाहिले नाही खरे ! पण वर्षानुवर्षे आमच्या दुकानावरून जात असलेला हा गृहस्थ आपले जाणे असे एकदम कायमचे बंद करील ही कल्पना नव्हती. भारत इतिहास संशोधन मंडळ किंवा साहित्य परिषद या संस्थाकडे जाताना त्यांना आमच्या पेरूगेट चौकातून जावे लागे.

काकासाहेब गाडगीळ, आबासाहेब मुजुमदार, पोतदार अशी मंडळी तेथून जात. पुढे पुढे काही वर्षानंतर या मंडळींच्या शरिरातला जोश कमी होताना दिसू लागला, मिशातले पांढरेपण वाढले, तेव्हा मनात येऊ लागले की आपल्याच पुण्यातील ही विख्यात मंडळी, यांची ओळख करून घेतली पाहिजे. आणि वेळच्यावेळी हे काम झाले पाहिजे. नाहीतर मागून वाटावयाचे, अरेरे ! रोज समोरून जात असताही आपण ओळख करून घेतली नाही. हे सर्व मनात येत राहूनही मुजुमदारांशी एकदाही बोलणे न होता ते गेले. काकासाहेबांशी एकदा बोललो, आणि पोतदारांशी तीन वेळा बोललो.

अर्थात माझे यात समाधान आहे. इतर असंख्य नागरिकांना एकदाही बोलण्याची संधी मिळाली नसेल. मी पोतदारांशी तीन वेळा तरी बोललो.

¤

अंत्ययात्रेचा मार्ग जाहीर झाला होता. त्याप्रमाणे अंत्ययात्रा स. प. महाविद्यालयाशी येणार होती. आमच्या घरापाशीच हे स्थळ असल्याने मी व माझी पत्नी आम्ही टिळकरोडवरील टिळक स्मारक मंदिराच्या तोंडाशी येऊन उभे राहिलो. टिळक स्मारक मंदिरापाशी हार घालण्यास काही लोक उभे होते. बोलता बोलता तिथे कळले की गेले काही दिवस आपण काय करतो हे पोतदारास कळेनासे झाले होते. त्यांची हकीगत ऐकून वाईट वाटले. प्रत्येक म्हातारपण वेगळ्या तऱ्हेनं संपतं. कुणाचं स्मरण जातं. कुणाला खावई सुटते, कुणाला विसरलेले मागचे मागचे प्रसंग चित्रपटासारखे दिसू लागतात. कुणाचं वागण्याचं भान जातं. म्हातारपणच्या

शेवटच्या थोड्या दिवसात, जीवात्म्याला ज्या यातना गर्भात प्रवेश करताना भोगाव्या लागत असतील, त्याच यातना म्हातारपणच्या शेवटच्या थोड्या दिवसांत सोसाव्या लागत असाव्यात.

अंत्ययात्रेची वाट पाहत असता असे काही विचार माझ्या मनात होते. माझ्या पत्नीच्या मनात काय आलं असेल कुणास ठाऊक? अंत्ययात्रेला स्त्रियांनी जाण्याची आपल्याकडे पद्धत नाही. असंख्य स्त्रियांनी स्मशानभूमी पाहिलेली नाही. आपण पाहत आहोत. ना. सी. फडके गेले तेव्हा पहिल्यांदा आपण गेलो होतो. तिला तो मागचा प्रसंग आठवला असेल. स्मशानभूमीच्या प्रवेशद्वारापर्यंत आत जावे की नाही याबद्दल ती साशंक होती. पण काही स्त्रियांना आलेल्या पाहून ती आत आली होती.

स्मशानभूमिवर स्त्रियांनी गेलेलं पुष्कळ स्त्री-पुरुषांना आवडणार नाही. माझं मत मात्र त्यांनी जाण्यास हरकत नाही. ज्यावरून स्मशानवैराग्य हा शब्दप्रयोग आला त्या एका दारूण अनुभवाला त्या मुकत आल्या आहेत असं मला वाटतं.

असे काहीतरी विचार आमच्या दोघांच्या मनात असता पेरूगेटकडून अंत्ययात्रा आलीही. अंत्ययात्रा फारच लहान होती. त्याचा धक्का बसला. बरोबर भजनी मंडळ होते. गेले काही महिनेच पोतदार अंथरूणावर होते. माणूस इतक्या लवकर विसरला जातो? की पोतदारांचे कार्य फक्त मुठभर सुशिक्षितांना ठाऊक होते?

अंत्ययात्रा टिळकरोडला येऊन स. प. महाविद्यालयाकडे वळल्यावर आम्ही सावकाश चालत वैकुंठभूमिकडे निघालो. थोडासा लांबचा रस्ता घेतला. कारण अंत्ययात्रा साहित्य परिषदेवरून जाणार होती.

□

पत्र्याच्या शेडखाली एका रांगेत चाललेली दहने, पायाखाली सारखी येणारी राख. रूक्ष उजाड नदीकाठ. धड बसा-उभं राहायला जागा नाही. सगळं शहर पेटलेल्या चितांच्या ज्वाळा पाहत आहे. सगळा उत्साह शोषून घेणारं ते जुनं स्मशान आता उरलं नाही. आता पुण्याची वैकुंठभूमी खरोखरीच मृत्यूचे भय जावे इतकी सुंदर आहे. चहूकडे वृक्षवेली फुललेल्या. चहूकडे हिरवळी, बसण्यासाठी जागोजागी कॉंक्रीटच्या ओवऱ्या. दहन करण्याच्या पूर्वापार तऱ्हेबरोबर विद्युतदाहिनीही आहे. चिता पेटल्यावर जो वेळ तिथे थांबून काढावा लागतो तो सर्वांत भयाण असतो, त्याची भयाणता इथे खूपच कमी होते. अर्थात मृत्यूचा परिणाम राहणारच. असं म्हणतात की बुद्धधर्मीय देशात मृत्यूचे दुःख सर्वांत कमी आढळते. बाली वगैरेसारख्या बेटात लोक अतिशय आनंदी आढळतात. बुद्धधर्मातील पुनर्जन्माची कल्पना त्यांचे मृत्यूबद्दलचे भय व दुःख नाहीसे करते.

□

संध्याकाळ भराभर उतरत होती. शवाला अग्नि देण्यापूर्वी शोकसभेला आरंभ झाला. शोकसभेत बोलण्यासाठी वक्ते गच्चीवर चढून गेले. पुण्याचे मेयर तरवडे, भाई वैद्य, इतिहाससंशोधन मंदिराचे डॉ. ग. ह. खरे, प्रा. डॉ. भीमराव कुलकर्णी, मोहन धारिया, वगैरे मंडळी वर दिसत होती. यावेळी मोहन धारिया व भाई वैद्य दोघांनी शिवचरित्राचा उल्लेख केला. हा अनुचित उल्लेख त्यांनी का करावा हे मला समजत नाही. जणू काही ते मृताच्या वतीने शिवचरित्र न लिहिण्याबद्दल क्षमा मागत होते. गेली काही वर्षे पोतदारांचे शिवचरित्र रहस्यकथेचा विषय व्हावा इतके गाजत होते. पण आता त्या चरित्रलेखनासाठी पोतदारांनी सरकारकडून काहीही द्रव्य घेतले नव्हते हे कळल्यावर पुष्कळांना शांत वाटावे. हा प्रकार काहीसा सीझरसारखा झाला आणि आता तर त्यांचे मृत्यूपत्र प्रसिद्ध झाले आहे ते वाचल्यावर त्यांना सीझरची दिलेली उपमा पूर्ण सार्थ झाली आहे. त्या मृत्युपत्रात आपले सर्वस्व शिक्षण प्रसारक मंडळीच्या ताब्यात देताना ते लिहितात—'(आनंद धाम) या जागेत मला प्राणापलीकडे प्रिय असलेले धन म्हणजे पुस्तके यांचा संग्रह आहे. तो दुर्मिळ व अपूर्व आहे. त्याचा संभाळ मी बहुत कष्टाने केला आहे. गेली ८० वर्षे मी वाढवीत आणलेला ग्रंथसंग्रह कोणीही बुद्धिपूर्वक नष्ट करू नये, अशी माझी सर्वांना शपथ आहे.'

मार्क अँतोनने सीझरचे मृत्यूपत्र वाचून दाखवून लोकांचा सीझरवरचा क्षोभ उलटविला. डॉ. ग. ह. खरे यांनी वैकुंठभूमिवरील शोकसभेत व नंतर वर्तमानपत्रात लिहिलेल्या लेखात अतिशय सुंदर तऱ्हेनं पोतदारांबद्दल सांगितले.

□

द. वा. पोतदार यांचा जन्म दि. ५-८-१८९० या दिवशी बिरवाडी गावी, ता. महाड व जि. कुलाबा येथे झाला. १९१० साली इतिहास विषय घेऊन ते बी. ए. झाले. १९१२ मध्ये ते नूतन मराठी विद्यालय, पुणे येथे शिक्षक झाले. १९३५ पर्यंत ते तेथे प्रमुख अध्यापक होते. नंतर स. प. विद्यालयात प्राध्यापक झाले. १९१० पासून ते भारत इतिहास संशोधन मंडळाचे सेक्रेटरी होते. १९४० साली अध्यक्ष झाले. १९३९ साली ते साहित्यसंमेलनाचे (नगर) अध्यक्ष होते. हिंदी शिक्षण समितीचे ते अध्यक्ष होते. वेदशास्त्रोत्तेजकसभेचे अनेक वर्षे उपाध्यक्ष होते. १९६७ साली त्यांना पद्मभूषण पदवी दिली. बनारस हिंदु विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट पदवी दिली. भारतीय संगीत प्रसारक मंडळ, मराठी ग्रंथालय, केंद्रीय संस्कृत मंडळ इत्यादि विविध संस्थेचे ते अध्यक्ष होते. काही संस्थांचे ते स्थापक होते तर काही संस्थांचे कार्य वाढवावयास त्यांनी सहाय्य केले.

इतक्या विविध क्षेत्रांत काम केलेले असून त्यांना ललित लेखन (कादंबरी—कथा) याविषयी प्रेम नव्हते. विशेषतः ऐतिहासिक कादंबरीकारांवर त्यांचा फार रोष होता. रणजित देसाई यांनी 'स्वामी' कादंबरीपासून सुरू केलेलं ऐतिहासिक कादंबरीचं युग त्यांना एवढं सुखकारक नव्हतं. हाडानं ते इतिहास संशोधक होते. कादंबऱ्यात होणारा ऐतिहासिक सत्याचा प्रलाप त्यांना सुखदायक नव्हता. इतिहाससंशोधन मंदिरात मला नक्की आठवत नाही, पण बहुधा रणजित देसाई यांच्या श्रीमान योगी कादंबरीसंबंधी झालेल्या प्रकाशनाच्या किंवा चर्चेच्या सभेत ते ऐतिहासिक कादंबऱ्यांबद्दल परखडपणे बोलले होते.

या ठिकाणी त्यांच्या ऐतिहासिक कादंबरीच्या मतांच्या संदर्भात या लेखारंभी मी त्यांना जो प्रश्न विचारला म्हटले त्याविषयी जेवढे उचित तेवढेच सांगायला हरकत नाही. वाचकांचे कुतहूलही त्यात शमेल. वसंत व्याख्यानमालेत व्याख्यानानंतर वक्त्यांस चहापाणी होते. तिथे मी त्यांना चहा पिताना म्हटले, शिवाजी महाराजांनी युरोपिअन पाव्हण्यांसाठी कपबशा, कॉफी वगैरे

सरंजाम ठेवला होता हे खरे का?' माझा प्रश्न ऐकताच ते उसळून म्हणाले, 'सगळं कपोलकल्पित आहे. कादंबरीकार वाटेल ते लिहितात आणि लोकांना खरं वाटतं. काही कॉफी, कपबशा वगैरे शिवाजीनं ठेवलं नव्हतं. सगळ्या गप्पा 'मी धाडस करून म्हटलं, 'त्या वेळच्या ब्रिटिशांच्या पत्रव्यवहारांत आहे हे.' ते म्हणाले, 'कुठे आहे दाखवा माझ्या वाचनात कुठे नाही.'

मला जरी वाटत असले की पत्रव्यवहारात कॉफीचा उल्लेख आहे तरी मी आता पुरावा बाहेर काढणार नाही. लेखक अगदीच इतिहासाला सोडत नाही हे त्यांना दाखवून ललित लेखकांबद्दलच त्यांचा राग मला कमी करावयाचा होता; पण आता त्याचा उपयोग नाही.

ललित लेखकांविषयी त्यांचा रोष असला तरी पोतदार आमचे लाडके वक्ते होते. आम्ही त्यांचे एक व्याख्यान ऐकले आणि नंतर जेव्हा जमेल तेव्हा आवर्जून त्यांचे व्याख्यान ऐकत आलो. त्यांचे व्याख्यान म्हणजे ज्ञानाची खुसखुशीत बनवलेली मेजवानी होता. एकाच व्याख्यानात इतके विविध विषय इतक्या रंजकतेनं सांगणारा वक्ता झाला नाही. काही लोक ते भरकटतात असे म्हणत. त्यांची पद्धत प्रसंगातून सांगण्याची होती. त्यांच्यात दात ओठ खात करकचत बोलण्याचा आवेश नव्हता. श्रोत्यांशी सहज गप्पा माराव्यात तसे ते बोलत. हसत हसत ते विरोधकांना गारद करीत ते परखडही होतं; पण त्यात वैयक्तिक काही नसे. महाराष्ट्र शासन प्रतिवर्षी उत्तम ग्रंथांना पारितोषिके देते. या पारितोषिक वितरणाचा मोठा समारंभ करण्याची सुरुवात शासनाने ज्या वर्षापासून केली त्या वर्षी मुंबई येथील स्कूल ऑफ आर्टच्या प्रांगणात झालेल्या समारंभात शासनाच्या शिक्षणविषयक धोरणाविषयी अशा काही कोपरखळ्या मारल्या की त्यांच्या मागे बसलेल्या शिक्षणमंत्र्यांनी त्यांच्या पाठीला 'आता पुरे,' दर्शवीत नमस्कार केला.

◻

पोतदारांविषयी सर्वत्र आदरयुक्त भीती होती. त्यांनी काहीही लिहिले नाही. ते न. चिं. केळकरानंतर पुण्यातले प्रत्येक सभेचे अध्यक्ष होत राहिले आणि फक्त बोलत राहिले अशीही एक गैरसमजूत त्यांच्याविषयी लोकात होती. वैकुंठ भूमिवरील आपल्या श्रद्धांजलीच्या व्याख्यानात आणि नंतरच्या लेखात डॉ. ग. ह. खरे यांनी पोतदार यांचे जे विश्लेषण केले ते अप्रतीमच होते. त्यांचे बोलणे कळकळीचे, आणि अतिशय परिचयानंतर येणाऱ्या अनुभवातून येते तसे आले. ते गदगदले होते. त्यांचा गुरू, त्यांचा सहकारी, पाठिराखा सर्वच गेला होता. पोतदार गेल्यामुळे महाराष्ट्राला आलेले सांस्कृतिक पोरकेपण त्यांना जाणवत होते. महाराष्ट्रात कुणालाही खरवडा तो आत राजकारण वेडा असतो. त्यामुळेच संस्कृतिवेडा असलेल्या या विरळ्या पुरुषाची उणीव खरे सारख्यांना जाणवली हे योग्यच होते. डॉ. खरे यांचे सगळेच मुद्दे त्यांच्या सांगण्याचा मोह बाजूला सारून मी भाषण आणि लेखनातून काही थोडके मुद्दे वेचतो. त्यांनीही आमच्याप्रमाणे पोतदारांच्या वक्तृत्वशैलीचे कौतुक केले. बेडर स्वाभिमानी वृत्ती दाखवताना ते कचरत नसत. समयाला साजेसे व लोकोपयोगी असे ते बोलत. त्यांचा अभ्यास सतत चालू होता. सल्ला घेण्यास त्यांच्याकडे सतत लोक येत. गडबडीच्या जीवनामुळे व्यवहारातून फुटकळ लेखन जरी झाले तरी महत्त्वाची ग्रंथनिष्पत्ती होऊ शकली नाही. पोतदार लोकांसाठी खर्ची पडले असेही आपले मत खरे यांनी सांगितले. खुद्द पोतदारही त्यांच्याजवळ तसे म्हणाले होते. शेंडी तुटो की पारंबी फुटो इतका ताण शासनाशी द्यावयांच्या सहकारात ते देत नसत. पारतंत्र्य काळात काही विषयात त्यांनी शासनाशी सहकार्य केले व स्वातंत्र्यकाळात असहकाराचा प्रश्नच त्यांनी निर्माण होऊ दिला नाही. नृपतिजनपदानाम दुर्लभकार्यकर्ता असे पोतदार होते.

◻

शोकसभेतील व्याख्यानात डॉ. ग. ह. खरे यांचे व्याख्यान सोडले तर बाकीची व्याख्याने सामान्याहून सामान्य झाली. आपण ज्याबद्दल बोलतो त्यांची माहितीही आपल्याला नाही याची पर्वा या वक्त्यांनी केली नाही. आपले राजकीय पुढारी प्रत्येक विषयात का बोलतात हे मला अजून कळलेले नाही. बरे बोलण्यास हरकत नाही पण थोडक्यात आवरावे तर तसेही करीत नाहीत. त्यांच्या बोलण्यात कळकळ नसल्याने जीव नसतो. त्यामुळे त्यांचे कुठलेही व्याख्यान शोकसभेचे वाटते. पाच दहा वाक्यात त्यांनी आपली भाषणे संपवावी अशी त्यांना माझी कळकळीची विनंती आहे.

ज्ञान आणि रंजकता यांनी ओसंडून जाणारी व्याख्याने ज्यांनी दिली त्या पुरुषाच्या श्रद्धांजलीच्या समयी इतकी कंटाळवाणी, कोरडी व्याख्याने व्हावीत हे दुर्दैवच. ही व्याख्याने चालू असता मला सारखी भीती वाटत होती की, दत्तो वामन पोतदार अवतीर्ण होऊन म्हणतील, अहो थांबा! ही व्याख्याने थांबवा. दत्तो वामन पोतदार म्हणून कुणी होता का हे नक्की सिद्ध करा. मात्र पुरावा दिल्याशिवाय बोलू नका. अहो! असा नव्हताच कुणी.

◻

एकदा आम्ही गायकवाडवाड्यावरून जात असता तेथे गणपती उत्सवात द. वा. पोतदार यांचे व्याख्यान चालू होते. आम्ही लगेच आत शिरून बसलो. आम्ही येण्याच्या आधी दत्तो वामन काय बोलले ठाऊक नाही. किंवा व्याख्यानाचा विषयही आता आठवत नाही. आम्ही गेलो तेव्हा जन्मदिनांचा विषय चालू होता. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस इंग्रजीवरून घेतल्याने त्यातले स्वारस्य कसे जाते हे सांगत असता कुणी कोणती जन्मतारीख धरली, कुणी कोणती धरली या आकडेवारीतून ते पंचागात शिरले व तेथून पंचागशुद्धीवर आले. सरकारने केलेले पंचागशुद्धीचे प्रयत्न सांगून ते पुण्यातील मंगलकार्यालयांचा इतिहास सांगू लागले. मंगल कार्यालयावरून ते आपलं लग्नं कसं राहिलं याचा किस्सा सांगून ते आजच्या नवविवाहितांच्या मधुचंद्राच्या नव्या चालीविषयी सांगता सांगता परदेशच्या प्रवासाची हकीगत त्यांनी सुरू केली. फ्रान्सला गेल्यावर पॅरिसमधील अंडरग्राऊंड रेलगाडीच्या रशियातील प्रवासाच्या गमती त्यांनी सांगितल्या.

कितीतरी वेळ आम्ही ऐकत बसलो. आम्हाला वाटले ते आता विषयावर येतील, मग येतील पण तास गेला दीड तास गेला. ते बोलत होते व आम्ही हसत होतो.

आता ती व्याख्याने आठवून एकाच गोष्टीचे वाईट वाटते. जेव्हा मृत्यू समोर आला तेव्हा दत्तो वामन पोतदार यांनी त्याला व्याख्यान देण्यास का आरंभ केला नाही. माझी खात्री आहे की त्यांचे ऐकत गालात हसत, तो दूर खिळून राहिला असता आणि दत्तो वामन आम्हाला आणखी काही काळ लाभले असते. ◻

# विद्यापीठ नामांतराचा स्टंट

पाटीलबुवा आंधळे, (एम्. ए., बी. एड्.)

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनचा मराठवाड्याच्या विकासाचा इतिहास पाहिला असता, औद्योगिक क्षेत्रात, शिक्षण क्षेत्रात आणि आर्थिक आघाडीवर मराठवाडा कमालीचा दुर्लक्षिला गेलेला आहे असे दिसते. याचे कारण मराठवाडा हा निजामशाहीखाली होता असे दिले जाते.

मराठवाड्याची आजची अवस्था पूर्वीपेक्षा फार निराळी आहे असे म्हणता येणार नाही, कारण मराठवाड्यातला सर्वसामान्य माणूस, ज्याला दोन वेळच्या भाकरीची पंचाईत असते, अशा माणसाला तर मराठवाडा सोडून बाहेर जावेच लागते; परंतु मराठवाड्यातील लोकांची पावसावरची शेती असल्यामुळे पावसाने तोंड काळे केले की, मराठवाड्यातल्या माणसाला आपल्या घराला सहा महिने कुलूप ठोकून त्यावर शेण थापावे लागते आणि मराठवाड्याच्या बाहेर दिवस काढायला जावे लागते. दर सहा महिन्याला मराठवाड्यातील माणसाचा आणि बैलगाड्याचा महापूर बऱ्याच प्रमाणात बाहेर जातो आणि सहा महिन्यांनी मराठवाड्यात परत येतो. मराठवाड्यातील माणूस मराठवाड्यातच जीवन जगू शकत नाही हे आमचे दुःख आहे.

मराठवाड्याची अस्मिता फार मोठी आहे. मराठवाड्याचा इतिहासही मोठा आहे. मराठवाड्याला साधुसंतांची परंपरा आहे, परंतु दुर्दैवाने मराठवाड्यातील सर्वसामान्य माणसाची आई, बहीण अर्धनग्नच राहिली, ही महाराष्ट्राच्या अस्मितेला लाजिरवाणी गोष्ट आहे.

मराठवाडा मागासलेला का राहिला याचे कारण शोधत असता, स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राला जे नेतृत्व लाभले त्या नेतृत्वाच्या पक्षपातीपणाचे पितळ स्पष्टच उघडे पडते. गावात जसा महारवाडा असतो तसा मराठवाडा हा महाराष्ट्राचा महारवाडा आहे. महाराष्ट्रातील उच्च स्तरीय लोक जे सत्तेवर गेले त्यांनी कधी मराठवाड्याकडे लक्ष दिलेच नाही. कारण त्यांना तशी कधी गरज भासलीच नाही. काळाची गरज ओळखून, मराठवाड्याची अनंत आव्हाने खांद्यावर घेऊन, मराठवाड्यातील माणसाच्या दुःखाला वेशीवर टांगण्याची हिंमत असणारा असा एकही नेता मराठवाड्यातून पुढे आला नाही आणि जे पुढे आले ते सत्तेसाठी हपापलेले आणि खुर्चीभोवती लाळ घोटणारे; म्हणून मराठवाड्याच्या प्रगतीचा विचार सत्ताधाऱ्यांनी कधी केलाच नाही.

मराठवाड्यातील लोकांच्या राजकीय सहभागाविषयीचे अज्ञान असे की, सहजासहजी समस्या सोडवणाऱ्या घोषणा देणाऱ्या कोणत्याही माणसाला ते निवडून देतात. या संदर्भात माझ्याच मतदारसंघाचे उदाहरण देणे योग्य ठरेल. बीड तालुक्यातील चौसाळा हा माझा मतदार संघ. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीला लोकसभेसाठी साताऱ्याचे क्रांतिसिंह नाना पाटील हे चौसाळा मतदार संघातून उभे राहिले आणि 'मी बीड जिल्ह्यात झोपडी बांधून राहणार आहे' एवढी एकच घोषणा देऊन ते निवडून आले. पुन्हा पाच वर्षांत चौसाळ्याचे तोंडसुद्धा त्यांनी कधी पाहिले नाही. मराठवाड्यातील माणसांना ठराविक राजकीय दिशाच नाही.

मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेच्या अगोदरपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, अजिंठा विद्यापीठ, ज्ञानेश्वर विद्यापीठ अशा अनेक नावांविषयी मंथन चालले होते. विशेषतः हैद्राबादच्या निजामशाहीपासून मराठवाड्याची मुक्तता करून मुंबई राज्यामध्ये मराठवाड्याचे विलिनीकरण व्हावे म्हणून लढलेल्यांपैकी 'स्वामी रामानंद तीर्थ' यांचे नाव द्यावे असाही विचार चालला होता, परंतु 'मराठवाडा विद्यापीठ' या नावामध्ये मराठवाड्याची अस्मिता, परंपरा आणि इतिहास या सर्वच गोष्टींचा उल्लेख होतो असे म्हणणारांचा एक गट तयार झाला आणि शेवटी त्यांचे पारडे जड होऊन 'मराठवाडा विद्यापीठ' असे विद्यापीठाला नाव देण्यात आले.

नंतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे नामांतर व्हावे ही पहिलीच मागणी पुढे आली आणि ताबडतोब तिचे रूपांतर राजकीय स्टंटमध्ये झाले. दलितांचे नाव घेऊन आम्ही दलितांचे कैवारी आहोत अशी लोकांची पद्धतशीर दिशाभूल करून आपला स्वार्थ साधण्याची प्रवृत्ती राजकारणात वाढली आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून आतापर्यंत नामांतराचा प्रश्न, मराठवाड्याचा विकास आणि दलितांच्या समस्या हे प्रश्नच मुळी कोणाच्या गावी नव्हते. अचानकच हे सर्व प्रश्न पुढे आले आणि त्याच्या अंमलबजावणीच्या वेळी मराठवाड्यातील महारा-मांगांच्या घरांच्या होळ्या झाल्या, त्याचबरोबर राजकारणी लोकांच्या स्टंटाचीही होळी झाली आणि हे प्रकरण मागे पडले.

आता या प्रकरणाचे संपूर्ण सामाजिकरण झाले आहे व तो एक सामाजिक स्टंट बनला आहे. राजकारणी लोकांची जिरली, परंतु आता हा प्रश्न समाजकारणी, समतावादी आणि तथाकथित परिवर्तनवादी यांनी हाताळायला सुरुवात केली आहे. समतावादी, समाजकारणी आणि परिवर्तनवादी यांचा हा निव्वळ स्टंट आहे, कारण गेली तीस वर्षे ते काही झोपलेले नव्हते.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून फक्त आताच मराठवाड्यातील माणसांनी या निर्बुद्ध, हिपॉक्रॅटिक पोलिटिकल लोकांचा आणि भोंदू समतावादी, समाजकारणी आणि परिवर्तनवाद्यांचा जाहीर दंगली-

द्वारे निषेध नोंदवला आहे. परंतु, पिसा रागे भाजिले घर। नागवला तो नेणे फार ॥ या तुकारामाच्या अभंगासारखी त्यांची गत झाली. पिसा घरातून घालवण्यासाठी त्यांनी घर भाजून काढले, परंतु त्यात तोच नागवला गेला.

महाराष्ट्राच्या गृहखात्याचे राज्यमंत्री श्री. भाई वैद्य यांनी दिलेल्या माहितीनुसार मराठवाड्यातील दंगलीत सुमारे १२०० कुटुंबे बेघर झाली. (केसरी १५ ऑगस्ट). मराठवाड्यात मालमत्तेचे किती नुकसान झाले याचा प्राथमिक अंदाज (६ सप्टेंबर सकाळमध्ये) आला आहे. सरकारी मालमत्तेचे नुकसान सुमारे ७१ लाख रुपये तर दलितांच्या मालमत्तेचे नुकसान १८ लाख रुपये एवढे झाले. सुमारे १३०० कुटुंबांची घरे जाळली गेली. ६०० कुटुंबांच्या घराची कमी-अधिक नुकसानी झाली, बाकी वैयक्तिकरीत्या घेतलेले सूड वेगळेच.

विध्वंस करण्याचीही एक युक्ती असते आणि त्यामधून काही लोकांना आपला स्वार्थ साधावयाचा असतो, हे मराठवाड्यामध्ये दंगली झाल्यावर निरीक्षकांच्याही लक्षात आले आहे. ज्यांनी नामांतराचा ठराव पास केला त्यांनी दंगली आटोक्यात आणण्यासाठी काहीच का केले नाही? या प्रश्नाचे उत्तर शासनकर्त्यांजवळ नाही. इकडे १० दिवस मराठवाडा उभा जळत होता आणि तिकडे मंत्रिपद कोणाला द्यायचे याचा विचार चालला होता.

विद्यापीठाचे नामांतर केल्याने मराठवाड्यातील दलितांच्या जीवनामध्ये आणि सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये कांहीच फरक पडणार नाही. कारण बाबासाहेबांचे नाव खाऊन कांही दलितांना जीवन जगता येणार नाही. महाराष्ट्रामध्ये पाटील नावाविषयी असाच लौकिक निर्माण झाला आहे. त्या लोकांना वाटते, आम्हाला घरात जोड्याने मारले तरी चालेल परंतु बाहेर पाटील म्हटले पाहिजे.

विद्यापीठ नामांतराने दलितांचे प्रश्न सुटतील का? मराठवाड्याच्या विकास आंदोलनाचा गर्भपात का झाला? अशा अनेक प्रश्नांचा विचार करीत असताना भाकरीचा प्रश्न मुख्य असून नामांतरासारख्या भावनात्मक प्रश्नाला पुढे करून मराठवाड्याच्या विकासाचा प्रश्न झाकण्याचा प्रयत्न चालला आहे असे वाटते. विकासाचा प्रश्न मागे सारून धर्मनिरपेक्षता आणि दलितांचा खोटा कैवार हा शासनकर्त्यांचा बुरखा फाडलाच पाहिजे. शाब्दिक आणि कोरड्या सहानुभूतीवर खूष होण्यासारखी मनःस्थिती मराठवाड्यातील माणसाजवळ आता राहिली नाही.

मराठवाड्याच्या विकास आंदोलनाचा गर्भपात कुठे झाला? विदर्भ, अहमदनगर याच्या तुलनेने मराठवाड्यातील राजकीय नेते, वृत्तपत्रे आणि विरोधी पक्ष यांनी हा प्रश्न कधी लावून धरलाच नाही हे प्रमुख कारण वाटते. खऱ्या अर्थाने मराठवाड्यातील पुढारी तळागाळातून आलेलेच नाहीत. ते लादलेले पुढारी आहेत. कारण निवडणुकीला कोणी उभे राह्यचे हे मुंबईत ठरत असे. महाराष्ट्रातील नेतृत्वाच्या खिशातील ही मंडळी असल्यामुळे मराठवाड्यातील विकासाच्या प्रश्नासंबंधी विचार करण्याची त्यांना कधी गरज भासलीच नाही.

१९५२ नंतर मराठवाड्यातील राजकारणाचे बळ काँग्रेसकडे होते. लोकसभा निवडणुकीत, १९५२ साली ६ पैकी ४ जागा १९५७ ला ७ पैकी ६ जागा, १९६२ मध्ये ७ ही जागा काँग्रेसला मिळाल्या. त्याचप्रमाणे १९६७ मध्ये ७ पैकी ६ जागा १९७१ मध्ये ७ पैकी ७ ही जागा काँग्रेसला मिळाल्या. परंतु १९७७ मध्ये जनता व मित्र पक्षाला ७ जागा मिळाल्या. काँग्रेसला फक्त १ जागा, (राखीव मतदार संघ, उस्मानाबाद) तुकाराम श्रृंगारे यांना मिळाली.

१९७२ च्या विधानसभा निवडणुकीत समाजवादी, संघटना काँग्रेस व जनसंघ यांना एकही जागा मिळाली नाही. काँग्रेस–३४ जागा, शेकाप–४ जागा व मार्क्सवादी–१ जागा असे वाटप होते.

१९७८ च्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाला १५ जागा, काँग्रेस–१६, कॉं. (I)–४ जागा, शेकाप–६ जागा मार्क्सवादी–१ जागा, मसाकॉ–२ जागा, असे मराठवाड्यातील राजकारणाचे चित्र होते.

मराठवाड्यातील नामांतराचा आग्रह धरणाऱ्या बांधवांना नम्र आवाहन आहे की, नामांतराच्या पोकळ प्रश्नासाठी झगडण्यापेक्षा घराघरातून कार्यकर्ते निर्माण करा; आज ज्या विभागासाठी, ज्या समाजासाठी आपण टक्कर देणार आहोत ती माणसे पोलिओ झाल्यासारखी आहेत. ती माणसे अगोदर माणसे बनवा. मुंबईत राहून प्रचार करण्याएवढी ही गोष्ट सोपी नाही. दलित नेते दलितांसाठी जे करायला हवे ते करीत नाहीत आणि चांडाळ चौकडी सभोवताली बाळगून दलितांचीच घरे उद्ध्वस्त करतात. हे कितपत योग्य आहे याचा विचार करावा.

मराठवाड्यातील दलितांना मराठवाड्यातील दलित नेताच नाही. हा सर्व खेळ बाहेरूनच चालतो. उच्चवर्णीय आणि दलितांतील उच्चवर्णीय हे लोक खऱ्या दलितांना बाजूलाच ठेवीत आहेत. आपण सगळेच उघडे आहोत. आपले सर्वांचे प्रश्न एकच आहेत, त्यासाठी सर्वांनी एकत्र झगडले पाहिजे, असा विचार बौद्ध दलित कार्यकर्त्यांमध्ये नाही, ही महाराष्ट्रातील दलित संघटनांची रास्त तक्रार आहे. म्हणून अगोदर अस्पृश्यांतली अस्पृश्यता नाहिशी झाली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे की, 'राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही स्थापन झाली पाहिजे. राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही स्थापन झाल्यावर दलित बांधवांना नामांतराचे आकर्षण राहणार नाही.

मी नामांतरवादी नाही आणि नामांतरविरोधीही नाही; परंतु नामांतराच्या प्रश्नामागची वस्तुस्थिती काय आहे. हे सत्यशोधण्याचा प्रयत्न एक मराठवाड्यातील सुबुद्ध नागरिक म्हणून करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

लोकसभेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. नामांतरवादी आणि नामांतरविरोधी लोकांना परस्पर आश्वासने देऊन निवडणुका जिंकण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून मराठवाड्यातील नागरिक, दलित बांधव आणि विचारवंत यांना नम्र आवाहन आहे, की या सत्ता स्पर्धेच्या युगामध्ये जो तो मोठे होण्यासाठी आणि सत्ता मिळवण्यासाठी स्टंट उभा करीत आहे. तरी या स्टंटला बळी न पडता, सदसद्विवेक बुद्धीला स्मरून बाबासाहेब आयुष्यभर ज्याच्यासाठी झगडले, तेच पाळावे आणि भाकरी शिक्षण व स्वातंत्र्य ज्यामुळे मिळेल तोच मार्ग स्वीकारावा.

# निवडणुका

## मुख्य आव्हान कोणते ?

### वा. दा. रानडे

गेल्या लोकसभा निवडणुकांत मतदारांनी दोन गोष्टी मनाशी ठरविल्या पाहिजेत. १. मतदानाबाबत उदासीन रहायचे नाही. २. इंदिरा कांग्रेसला कोणत्याही परिस्थितीत मत द्यावयाचे नाही, असे मी गेल्या लेखात म्हटले होते. मत कोणाला द्यावयाचे याचा निर्णय घेताना देशापुढील मुख्य आव्हान कोणते याचा विचार करायला हवा. त्या संबंधात यावेळी थोडेसे लिहीत आहे.

हुकूमशाही आणि जातीयवाद या दोन्ही प्रवृत्तींविरुद्ध आम्हाला लढावयाचे आहे अशी भाषा लोकदल–कांग्रेस आघाडी व डाव्या गटाचे नेते बोलत आहेत. तत्त्वतः त्यासंबंधी दुमत होण्याचे कारण नाही. पण या तात्त्विक भूमिकेतून त्यांना सूचित करावयाचे आहे ते मात्र पूर्णपणे बरोबर नाही. हुकूमशाही व जातीयवाद यांना विरोध, यातून इंदिरा कांग्रेस, जनता पक्षाला विरोध त्यांना सूचित करावयाचा आहे. जनता पक्षावर जनसंघाचा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभाव आहे म्हणून जातीयवादाला विरोध करायचा तर जनता पक्षालाही विरोध करायला हवा, अशी त्यांची भूमिका आहे. याच प्रश्नावर भालोद, समाजवाद्यांचा लिमये–फर्नांडिस गट आणि लोकशाहीवादी कांग्रेसचा बहुगुणा गट यांनी जनता पक्ष फोडून मोरारजीभाईंचे सरकार पाडले. हे सरकार पाडून त्यांनी काय साधले ? चरणसिंगांना सरकार बनविताना अखेर इंदिरा कांग्रेसचाच आधार घ्यावा लागला. हा आधारही निसटता ठरला. लोकसभेत विश्वासाचा ठराव पास करून घेण्याइतके बहुमत आपल्या बाजूला नाही हे चरणसिंगांना स्पष्ट दिसून आल्याने त्यांनी राजीनामा दिला. राष्ट्रपतींनी लोकसभेचे विसर्जन करून चरणसिंगांना काळजीवाहू सरकार म्हणून निवडणुकीपर्यंत काम पाहण्यास सांगितले. देशावर निवडणुकांचा प्रसंग फूटपाड्यांनी जनता पक्षात घडवून आणलेल्या फुटीमुळे ओढवला, ही वस्तुस्थिती मतदार विसरू शकत नाहीत. फूटपाड्यांबद्दल त्यांच्या मनात चीड असणे स्वाभाविक आहे.

जनता पक्षावर संघाचा पगडा आहे असा प्रचार इंदिरा गांधींनी गेल्या निवडणुकीच्या वेळीच केला होता, पण मतदारांवर त्याचा प्रभाव पडला नाही. यावेळी जनता पक्ष फोडणारे गट तोच प्रचार करीत आहेत, पण त्यामुळे त्यांचे बळ वाढण्याऐवजी इंदिरा कांग्रेसचे बळ वाढण्यास मदत होणार आहे. जनता पक्षाविरुद्ध केला जाणारा हा प्रचार तरी कितपत खरा आहे आणि लोकदलाचा जनसंघविरोध तरी कितपत खरा आहे ? जनता पक्षाच्या स्थापनेच्या वेळेपासूनच दुहेरी निष्ठेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता व त्यावर निर्णय घेण्यास नेत्यांनी विलंब लावला हे खरे, पण त्यासाठी पक्ष फोडणे समर्थनीय ठरत नाही. जनता पक्षाच्या सभासद नोंदणीत जनसंघाने रा. स्व. संघ स्वयंसेवकांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर सभासद नोंदविले आणि पक्षांतर्गत निवडणुकांतून सबंध पक्ष जनसंघाच्या नियंत्रणाखाली जाण्याचा धोका इतर घटकांना दिसू लागला. ते थोपविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बनावट सभासद नोंदणी झाली आहे. पक्षाच्या निवडणुका घेण्यापूर्वी त्याची छाननी झाली पाहिजे अशी मागणी भालोद आणि लिमये–फर्नांडिस यांच्या समाजवादी गटाने केली. या प्रश्नावर वाटाघाटीतून समाधानकारक तोड काढता आली असती. पक्ष फोडणे हा काही त्यावरचा उपाय नव्हता.

तसेच भालोदचा जनसंघ विरोध हा खरा नाही. उत्तरेकडील राज्यात १९७८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर भालोद आणि जनसंघ यांनी आपसात अलिखित करार करून मुख्यमंत्रिपदे आपसात वाटून घेतली होती. त्या वेळी जनसंघाचा जातीयवाद भालोदला नडला नाही. पंतप्रधान होण्यासाठी जनसंघाने आपल्याला पाठिंबा दिला तर दुहेरी निष्ठेचा प्रश्न आपण उपस्थित करणार नाही अशी तयारी चरणसिंग यांनी दर्शविली होती असा गौप्यस्फोट लालकृष्ण अडवानी यांनी एका पुस्तकात नुकताच केला आहे.

दुसरे असे की जनता पक्षावर जनसंघाचा पगडा आहे म्हणजे नेमके काय ? जनता पक्षाची अधिकृत भूमिका बाजूला ठेवून जनसंघाचे लोक आपल्या गटाचीच भूमिका पक्षावर लादत आहेत असे आढळून आलेले नाही. पंतप्रधानपदासाठी त्यांच्या गटाने आग्रह धरला नाही, उलट आपण मंत्रिमंडळ बाहेर पडण्याने जनता पक्षातील फूट टळणार असेल तर तसे करण्याची तयारी जनसंघ मंत्र्यांनी दर्शविली होती; पण राज्यपातळीवरील जनसंघ नेतृत्वाने हा समजूतदारपणा नेहमीच दाखवला असे नाही. जनसंघ गटाच्या हातून काहीच चुका झालेल्या नाहीत असे येथे सूचित करावयाचे नाही; पण पक्ष फोडणे हा त्यावर उपाय नव्हता.

जनता पक्षातील फूट सांधता येणे शक्य असेल तर अजूनही त्या दिशेने प्रयत्न करायला हवेत. पक्षातून बाहेर पडण्यात आमची चूक झाली हे बाहेर पडलेल्यांनी मोकळेपणाने मान्य करावे. दुहेरी निष्ठेच्या प्रश्नावर त्वरित समाधानकारक तोड काढण्यात येईल आणि जनता पक्ष सर्व महत्त्वाचे निर्णय अंकगणिती बहुमताने नव्हे तर सर्व घटकांच्या विचारविनिमयाने सहमताने घेईल असे आश्वासन आजच्या नेतृत्वाने द्यावे. जनता पक्ष सभासद नोंदणीची छाननी करून पक्षांतर्गत निवडणुकीचा कार्यक्रम आखण्यात यावा. पक्षाच्या एकजुटीची योजना आखण्यासाठी आचार्य कृपलानी, न्या. छगला, न्या. तारकुंडे यासारख्या ज्येष्ठ नेत्यांची समिती नेमावी असे या अनुषंगाने सुचवावेसे वाटते, वेळ फार थोडा आहे. फूट सांधण्यासाठी ३० नोव्हेंबर ही अखेरची मुदत ठेवावी. पक्षांतर्गत संघर्षातून एवढ्या कटु भावना निर्माण झाल्या आहेत की फूट सांधणे फार कठीण दिसते. तरीही हुकूमशाहीचा धोका एवढा मोठा आहे की या दिशेने अखेरचा प्रयत्न करायला हवा. विचारवंतांनी दोन्ही बाजूंच्या नेत्यांना एकजुटीचे आवाहन केल्यास त्याचा परिणाम होईल. विभागलेले समाजवादी एकत्र येऊन महत्त्वाची कामगिरी बजावू शकतील. एक पक्ष पुनः होऊ शकत नसेल तर निदान एक आघाडी तरी उभारावयास हवी. सर्व इंदिराविरोधी शक्तींना अशा व्यापक आघाडीत सामील करून घेतले पाहिजे. हुकूमशाहीच्या धोक्यापुढे बाकी सर्व प्रश्न दुय्यम समजले पाहिजेत.

तेव्हा मुख्य आव्हान कोणते ते ओळखून त्याला तोंड देण्यासाठी सर्व लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र आले पाहिजे. परिस्थितीचे त्यांना आव्हान आहे ते त्यांनी पेलले नाही आणि त्यासाठी आवश्यक असलेला समंजसपणा न दाखवल्यामुळे लोकशाही शक्ती दुभंगलेल्या राहिल्या आणि त्याचा फायदा मिळून इंदिरा गांधींना पुनः सत्तेवर येण्याची संधी मिळाली तर भावी इतिहासकार त्याबद्दल लोकशाहीवादी शक्तींनाच दोष दिल्याशिवाय राहणार नाहीत. □

# चौधरी चरणसिंग : एक राजकीय अभ्यास

डॉ. अशोक चौसाळकर

आधुनिक भारतीय राजकारणात श्रीमती इंदिरा गांधींचा अपवाद वगळता सध्याचे काळजीवाहू प्रधानमंत्री चरणसिंग हे अतिशय वेगळे असे व्यक्तिमत्त्व आहे. राजकीय साहस व राजकीय परिस्थिती आपल्या बाजूने वळवून घेण्यात ते वाकबगार आहेत. भारतीय राजकारणात चरणसिंगांचा उदय हरितक्रांतीबरोबरच झाला आणि हरितक्रांतीतून निर्माण झालेल्या शक्तींचे प्रतिनिधित्व करीत त्यांनी पंतप्रधानपद गाठले. १९६७ नंतर भारतीय राजकारण हळूहळू खुले होऊ लागले. निरनिराळ्या सत्तागटांतील स्पर्धा वाढली आणि तत्त्वाच्या राजकारणाची जागा सत्तेच्या राजकारणाने घेतली. लोकशाहीला अभिप्रेत असणाऱ्या स्पर्धात्मक राजकारणात सत्तेचे राजकारण अपरिहार्य असते. चरणसिंग व इंदिरा गांधींनी सत्तेचे राजकारण मोठ्या प्रमाणात करून भारतीय राजकारणात नानाविध जातींचा व वर्गांचा आवाज प्रथमतः उमटविला. प्रस्तुत लेखात चरणसिंगांच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास करणाचा प्रयत्न करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील एका लहान पुढाऱ्यांमधून पहिला भारतीय शेतकरी पंतप्रधान कसा निर्माण झाला, याचा अभ्यास येथे आपणास करावयाचा आहे. असा प्रयत्न उत्तर भारतातील जातीव्यवस्था व त्याला छेदून जाणारी १९६० मधील हरितक्रांती व यांच्या संदर्भात करणे अपरिहार्यच आहे.

चरणसिंग हे एका जमीनदार जाट कुटुंबात जन्मास आले. (१९०२) आणि त्यांनी एम. ए. एल.एल. बी. पर्यंत शिक्षण घेतले. काँग्रेसच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्यामधून ते उत्तर प्रदेशच्या राजकारणात घुसले आणि काही दिवसांनी उत्तर प्रदेशचे महसूलमंत्री बनले. चरणसिंगांचा स्वभाव अभ्यासू असल्यामुळे त्यांनी जमीनसुधारणा कायद्यांचा अभ्यास करून उत्तर प्रदेशात हे कायदे व्यवस्थित राबविले आणि शेतीमधील सरंजामदारी पद्धती बरीचशी कमी केली. आणि स्वतः जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांकडे शेतांची मालकी सोपवून या वर्गाच्या उदयाचा मार्ग सुरू केला. या विषयावर त्यांनी दोन पुस्तके पण लिहिली,

चरणसिंग हे पंजाबातील आर्यसमाज चळवळीने प्रभावित झालेले होते; पण त्यांच्या विचारसरणीमध्ये त्या काळात शक्तिशाली असणाऱ्या जमीनदारांच्या अनुदार व सनातनी विचाराचा प्रभाव टिकून राहिला. त्यामुळेच त्यांनी समाजवादाला विरोध केला, दलितांच्या शेती कसण्याच्या कसबाबद्दल शंका व्यक्त केली आणि प्रशासनात स्त्रीविरोधी दृष्टिकोण स्वीकारला; पण सध्याच्या राजकारणी पुढाऱ्यांमध्ये ते सर्वात जास्त बहुश्रुत असे पुढारी आहेत. त्यांचे ग्रंथालय समृद्ध असून त्यांनी बरेच वाचन केलेले आहे. आपल्या उजव्या विचारासह चरणसिंग उत्तर प्रदेशच्या राजकारणात शिरले आणि राज्याचे महसूलमंत्री झाले. त्यांनी प्रत्येक खाती भूषविली. राज्य काँग्रेसमधील चंद्रभानु गुप्ता व कमलापती त्रिपाठी यांच्या भांडणात त्यांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला.

## पक्षांतराचे सूतोवाच

१९६७ च्या निवडणुकीत उत्तर प्रदेशात काँग्रेसपक्षाला ४५२ पैकी फक्त १९७ जागा मिळाल्या पण अपक्षांच्या मदतीने चंद्रभानु गुप्ता यांनी सरकार बनविले. या वेळी चंद्रभानु गुप्तांविरुद्ध चरणसिंगांनी काँग्रेसविधायक दलाच्या नेतेपदाची निवडणूक लढविली; त्यात ते पराभूत झाले. गुप्तांनी त्यांना मंत्रिमंडळात पण घेतले नाही. विरोधी पक्ष त्या वेळी एकत्र होते. राजनारायण व नानाजी देशमुख यांनी हेरले की, चरणसिंग हा एक असंतुष्ट आत्मा आहे आणि त्यांना मख्यमंत्रिपदाची लालूच दाखविली तर कदाचित ते काँग्रेसपक्षाचा त्याग करतील. राजनारायणांनी मुख्यमंत्रिपदाचे आमिष दाखविताच चरणसिंग आपल्या २० पाठीराख्यांसह काँग्रेसमधून बाहेर पडले आणि ते उत्तरप्रदेशचे मुख्य मंत्री झाले. उत्तरप्रदेशचे मुख्य मंत्री बनण्याची त्यांची इच्छा पूर्ण झाली. आपण मागासलेल्या जातीत जन्माला आलो म्हणून आपणास ब्राह्मण व वैश्य जातीतील पुढाऱ्यांसारखे मुख्य मंत्री बनता आले नाही असा त्यांचा पूर्वग्रह होता व अजूनही तो आहे.

चरणसिंगांनी संविदचे सरकार स्थापन करून भारतात पक्षान्तराच्या राजकारणाचा सूतोवाच केला. पक्षान्तरामुळे हरियाना आणि मध्यप्रदेश येथील काँग्रेसची सरकारे पण पडली. मुख्य मंत्री बनताच चरणसिंगांनी आपला वचक बसवला व हळूहळू भारताचा प्रधानमंत्री बनण्याची आकांक्षा त्यांच्या मनात मूळ धरू लागली. त्यांनी जनकाँग्रेसची स्थापना केली. ते उत्तम प्रशासक असल्यामुळे त्यांच्या हातून काही चांगली कामे पण झाली. चरणसिंगांचा स्वभाव हट्टी, हेकेखोर आणि तिरसट असल्यामुळे त्यांचे व राजनारायण यांचे

फारसे जमले नाही. राजनारायण त्या वेळी संयुक्त समाजवादी-पक्षाचे अध्वर्यु होते.

याच काळात चरणसिंगांनी नवा राष्ट्रीय पक्ष जन्मास घालण्याचा निश्चय केला. त्या वेळी भारतातील पाच मुख्य मंत्री भूतपूर्व काँग्रेसवाले होते (बिहार–महामायाप्रसाद सिन्हा, हरियाना–राव वीरेन्द्रसिंह, प. बंगाल–ए. के. मुखर्जी, मध्यप्रदेश–गोविंद नारायणसिंग आणि पंजाब–गुरुनामसिंग) या मुख्यमंत्र्यांच्या व हरेकृष्ण मेहताब, हुमायून कबीर द. का. कुंटे व पवित्र मोहन प्रधान यांच्या साहाय्याने त्यांनी नव्या पक्षास जन्म दिला. यात त्यांना बिहारच्या महामायाबाबूंनी साथ दिली आणि तेच या पक्षाचे अध्यक्ष पण झाले. वीरेन्द्रसिंग, गुप्तनामसिंग, जी. एन. सिंग हे या पक्षात सामील झाले नाहीत. पक्षाचे नाव ठेवण्यात आले, भारतीय क्रांतीदल. ह्या पक्षाचे बहुतेक मुख्य मंत्री १९६७ च्या शेवटास पदच्युत झाले.

चरणसिंगांचे राजनारायणांशी जसे पटले नाही तसे जनसंघाशी पण पटले नाही. संयुक्तविधायक दलातील जनसंघ हा सर्वांत मोठा घटक होता. चरणसिंगांचे बहुमत असतानादेखील त्यांनी राजनारायण यांच्या टीकेला कंटाळून राजीनामा दिला व इंदिरा गांधींना चंद्रभानु गुप्तांना मुख्य मंत्री होऊ द्यायचे नव्हते म्हणून त्यांनी विधानसभा बरखास्त केली व नव्याने निवडणुका घेतल्या.

मध्यावधी निवडणुकीत भारतीय क्रांतिदल हा सामर्थ्यवान पक्ष म्हणून उतरला पण त्याआधी चरणसिंगांनी जनसंघास व कम्युनिनिस्टास आपले नंबर एकचे शत्रू घोषित केले. भाक्रांदने कम्युनिस्टांशी कोणच्याही प्रकारचा संबंध ठेवू नये असा ठराव केला; तो बंगालच्या अजयकुमार मुखर्जींना आवडला नाही. त्यांनी पक्षाचा त्याग केला. महामायाबाबूंच्या गटाचा आधार असलेला शक्तिशाली कामाक्ष नारायणसिंग यांचा गट बाहेर फुटून निघाला. त्यामुळे पक्षात त्यांचे वजन कमी झाले. मध्यावधी निवडणुकांत राजनारायण यांनी चरणसिंगांची चेअरसिंग म्हणून संभावना केली. निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले पण चरणसिंगांचा पक्ष एक शक्ती म्हणून उदयास आला. पक्षास ९८ जागा मिळाल्या. जनसंघाचा मोठाच पराभव झाला.

या राजकीय पराक्रमामुळे चरणसिंग भारतीय क्रांतिदलाचे अध्यक्ष बनले. लोकसभेत त्यांनी आपला गट स्थापन केला. गटात १२ सभासद होते. हळूहळू चरणसिंग राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करते झाले. १९६९ साली राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या वेळी भाक्रांदने डॉ. सी. डी. देशमुखांच्या उमेदवारीस पाठिंबा दिला. पण दुसऱ्या क्रमांकाची मते व्ही. व्ही. गिरींना दिली. भाक्रांदची त्यावेळी २१००० मते होती. भाक्रांदच्या मतांमुळे रेड्डींचा १४००० मतांनी पराभव झाला आणि गिरी यांचा विजय झाला. चरणसिंगांचा हा निर्णय फार महत्त्वाचा ठरला. त्यांनी तो उत्तर प्रदेशच्या राजकारणावर डोळा ठेवून घेतला होता. कारण रेड्डींचे समर्थक चंद्रभानु गुप्ता यांचेशी त्यांचे हाडवैर होते.

## पुन्हा उत्तर प्रदेशचे मुख्य मंत्री

बहुमत संपले म्हणून चंद्रभानु गुप्तांनी फेब्रुवारी १९७० साली राजीनामा दिला. त्यांनी राज्यपालास चरणसिंगांना मंत्रिमंडळ बनविण्यास पाचारण करण्याची विनंती केली. चरणसिंगांना जनसंघ व संसोपा यांनी पाठिंबा देऊ केला. याचवेळी चरणसिंग इंदिरा गांधींशी पण बोलणी करीत होते. त्यांनी सी. बी. गुप्तांच्या सूचनेस वाटाण्याच्या अक्षता लावून त्याची ' मरी बचिया बम्मनको दान ' अशा शब्दात संभावना केली. काँग्रेस आणि भाक्रांदचे सरकार सत्तेवर आले. इंदिरा गांधींनी चरणसिंगांनी काँग्रेसमध्ये सामील व्हावे अशी सूचना केली. काही दिवस अशीही बातमी होती की, चरणसिंग भाक्रांदसह काँग्रेसमध्ये सामील होणार असून त्यांची केंद्रात गृहमंत्री म्हणून नेमणूक होणार आहे. पण चरणसिंगांनी आपला पक्ष अलग ठेवला. राष्ट्रीय राजकारणात पण आपण महत्त्वाची भूमिका बजावू शकू अशी त्यांची खात्री होती.

कमलापती त्रिपाठी व चरणसिंग याचे फार काळ जमणे शक्यच नव्हते. कारण चरणसिंग ऐनवेळी आपणास धोका देतील असे त्यांना वाटत होते, म्हणून ऑक्टोबर १९७० मध्ये काँग्रेसने आपला पाठिंबा मागे घेतला. चरणसिंगांना विरोधी पक्षांनी पाठिंबा जाहीर केला पण इंदिरा गांधींनी चरणसिंगांचे सरकार राज्यपालाकरवी बरखास्त केले. राज्यपालांचा हा निर्णय फारसा बरोबर नव्हता. सी. बी. गुप्तांनी चरणसिंगांना पुन्हा मुख्य मंत्री बनू दिले नाही. त्यामुळे चरणसिंग १९७१ च्या मध्यावधी निवडणुकीत बड्या आघाडीत सामील झाले नाहीत. या आघाडीचा पुढारी कोण असावा हे आधी ठरवावे अशी त्यांची मागणी होती.

## चरणसिंगांचा पडता काळ

१९७१ च्या निवडणुकीत सर्वच विरोधी पक्षांचा मोठाच पराभव झाला. हरितक्रांतीमुळे फायदा झालेला वर्ग मोठ्या प्रमाणात काँग्रेसच्या मागे गेला. सरंजामदारी वर्गाने बड्या आघाडीस पाठिंबा दिला पण आघाडी फारशी यशस्वी झाली नाही. यावेळी चरणसिंगांनी लोकसभेसाठी निवडणूक लढविली पण त्यांचा कम्युनिस्ट पक्षाच्या उमेदवाराने पराभव केला. त्यास काँग्रेसचा पाठिंबा होता. आणि चरणसिंगांच्या पडत्या काळास सुरुवात झाली. त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनी पक्षांतर केले. त्यात त्यांचे उजवे हात जयराम वर्मा यांचा पण समावेश होता. उत्तर प्रदेश विधानसभेत भाक्रांदचे फक्त ५० सभासद राहिले होते. १९७३–७४ साली गुजरात व बिहारमध्ये इंदिरा गांधी सरकारविरुद्ध आंदोलनास सुरुवात झाली. परिस्थितीला कंटाळून जयप्रकाश नारायणांनी सरकारविरुद्ध आपले आंदोलन सुरू केले.

इंदिरा गांधींनी गव्हाची एकाधिकार खरेदी करण्याचा जो कार्यक्रम लागू केला त्यात शेतकऱ्यांना कमी किंमतीत धान्य विकावे लागले. त्याच काळात मोठा दुष्काळ पडला. मोठ्या प्रमाणात चलनवाढ झाली आणि अरबांनी तेलाच्या दरात वाढ केल्यामुळे सर्वच वस्तूंच्या किंमती वाढल्या. इंदिरा गांधींच्या सरकारविरुद्ध व काही काँग्रेस पुढाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले. हळूहळू व्यवस्थेवर दबाव येत होता. इंदिरा गांधींना कठीण परिस्थितीशी सामना द्यावयाचा होता. अशा परिस्थितीत आपण याचे राजकीय भांडवल करू शकू अशी चरणसिंगांची खात्री होती.

याच काळात चरणसिंग व राजनारायण हे जवळ आले. चरण-

सिंगांनी राजनारायणांना राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी मदत केली. राजनारायणांना समाजवादी पक्षातून मधू लिमये व जॉर्ज फर्नांडिस यांनी काढून टाकले. ते पण एका नव्या घरोप्याच्या शोधात होते. राजाजींच्या निधनानंतर स्वतंत्र पक्ष मृत्युपंथास लागला होता. ओरिसात राजेन्द्र नारायणसिंगदेवांच्या निधनानंतर पक्षास नेतृत्व राहिले नव्हते. बिजु पटनाईकांनी कॉंग्रेसमधून पक्षांतर करून मुख्य मंत्री बनण्याचा घाट घातला होता पण राज्यपालांनी विधानसभा भंग करून नव्या निवडणुका घेण्याचा आदेश दिला. त्यामुळे ते पण नव्या राजकीय बनावाच्या प्रयत्नात होते. या सर्वांना एकत्र आणण्याचा चरणसिंग यांनी निश्चय केला आणि भाक्रांद, स्वतंत्र, संसोपा व प्रगती या चार पक्षांचे विलिनीकरण होऊन भारतीय लोकदल नावाचा नवा पक्ष जन्मास घातला.

चौधरी चरणसिंग या नव्या पक्षाचे अध्यक्ष झाले. अशाच प्रकारे सर्व विरोधी पक्षांचा एक विरोधी पक्ष करण्याची कल्पना त्यांनी मांडली. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी चर्चिलच्या त्या भाषणाचा उल्लेख केला. ज्यात चर्चिल यांनी भारत स्वतंत्र झाल्यावर भारताचे पुढारी त्याचे वाटोळे करून टाकतील असे भविष्य वर्तविले होते. चरणसिंगांना यावेळी त्याची आठवण झाली. भारतीय लोकदलाची निर्मिती प्रामुख्याने उत्तर प्रदेश व ओरिसा या दोन प्रांतातील निवडणुकांवर लक्ष ठेवून केली होती. या दोन्ही प्रांतात भारतीय लोकदलाचे आवाहन हेमवतीनंदन बहुगुणा आणि नंदिनी सत्पथी यांनी उजव्या कम्युनिस्ट पक्षाच्या मदतीने मोडून काढले. उत्तर प्रदेशात लोकदलास १०६ ( ४२५ एकूण ) आणि ओरिसात ५५ ( १४० एकूण ) जागा मिळाल्या. मते बरी मिळाली पण जनसंघाच्या उमेदवारांमुळे पक्षाचा पराभव झाला.

यानंतर जयप्रकाशांची चळवळ जास्तच जोरात सुरू झाली व राजनारायण आणि चरणसिंग यांनी त्याचा फायदा घ्यावयास सुरुवात केली. जनतामोर्च्याने गुजरात विधानसभेची निवडणूक जिंकल्यानंतर विरोधी पक्षामध्ये जास्तच एकी निर्माण झाली. या काळात सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येण्याची सूचना चरणसिंगांनी सतत केली. राजनारायण यांनी अलाहाबाद हायकोर्टमध्ये आपली केस जिंकली आणि आणीबाणीची घोषणा झाली. जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई यांच्याप्रमाणेच राजनारायण व चरणसिंगपण जेलमध्ये गेले. १९७६ च्या शेवटास चरणसिंग व बिजू पटनाईक यांचे धैर्य खचले. बिजू पटनाईक यांनी नंदिनी सत्पथींना पदच्युत करण्यात संजय गांधीस मदत केली आणि वीस कलमी कार्यक्रमास पाठिंबा जाहीर केला. चरणसिंगांची कैदेतून सुटका झाली आणि त्यांनी इंदिरा गांधींशी बोलणी सुरू करण्याची मागणी केली. जर आणीबाणी लौकर उठली नसती तर कदाचित चरणसिंग व बिजू पटनाईक यांनी वीस कलमी कार्यक्रमाच्या प्रचारार्थ पदयात्रा काढल्या असत्या. कारण संजय गांधींना त्यांनी कम्युनिस्टाविरुद्ध हल्ला सुरू केला म्हणून पाठिंबा देऊ केला होता; पण निवडणुकांची घोषणा झाली व संपूर्ण राजकीय वातावरणात बदल झाला.

निवडणुकीसाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येण्याची सूचना जे. पी. नी केली पण मोरारजी देसाई त्यास तयार नव्हते. चरणसिंगांना एकी हवी होती. त्यांना त्या पक्षाचे अध्यक्ष बनायचे होते पण मोरारजींच्या रूपाने त्यांना त्यांच्यासारखाच हट्टी प्रतिस्पर्धी भेटला. त्यांची वरिष्ठता लक्षात घेऊन त्यांचे अध्यक्षपद चरणसिंगांनी मान्य केले पण स्वत: पक्षाचे उपाध्यक्ष बनले. संघटना कॉंग्रेस, समाजवादी जनसंघ व भालोद हे चार पक्ष एकत्र आले व त्यांनी जनता पक्षास जन्म दिला. चरणसिंगांच्या अखिल भारतीय महत्त्वाकांक्षेस यापासून सुरुवात झाली. याच वेळी जगजीवनराम व बहुगुणा यांनी कॉंग्रेसचा राजीनामा दिला. हा कॉंग्रेसपक्षाला फार मोठा धक्का होता. त्यामळे पक्षाचा पराभव निश्चित झाला.

## नेहरूवादविरोध

जनतापक्षाची स्थापना झाल्यानंतर पक्षावर आपला ठसा पाडण्याचा चरणसिंगांनी प्रयत्न सुरू केला.चरणसिंग हे सध्याच्या राजकीय पुढाऱ्यांमधील एक अभ्यासू व मोठ्या प्रमाणात वाचन केलेले पुढारी असल्यामुळे त्यांनी जनतापक्षाची वैचारिक भूमिका नेहरूवादाला विरोधी अशी व व्यवस्थितपणे विकसित केली. जनतापक्षाचा निवडणूक जाहीरनामा त्यांनी प्रकाशित केला आणि तो बनविण्यातपण महत्त्वाची भूमिका पार पाडली.

त्यांनी घोषणा केली, की जनतापक्षाचा मुख्य उद्देश गांधीवादी समाजवाद आणणे हा आहे. हा गांधीवादी समाजवाद विकेंद्रीकरणाच्या सिद्धांतावर आधारलेला होता. आणीबाणीचे मुख्य कारण सार्वजनिक क्षेत्राच्या वाढीमुळे निर्माण झालेली केंद्रीकृत अर्थ रचना हे होते. या आर्थिक केंद्रीकरणातूनच राजकीय केंद्रीकरणाचा व श्रीमती गांधींच्या हुकूमशाहीचा जन्म झाला. भारताचा विकास-भारतीय शेतीचा विकास न केल्यामुळे झाला नाही. बड्या उद्योगधंद्यांची भारतास एवढी आवश्यकता नाही. आपण सत्तेचे विकेंद्रीकरण्यासाठी लघु व कुटीर उद्योगधंद्यांचा विकास केला पाहिजे. ग्रामीण भागाचा विकास केला पाहिजे. सार्वजनिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार न करता शेती सुधारणेवर व ग्रामविकासावर भर दिला पाहिजे असे त्यांचे मत होते. परराष्ट्र धोरणात खऱ्याखुऱ्या अलिप्ततेचा त्यांनी पुरस्कार केला. चरणसिंगांची ही मते मोरारजी, जनसंघ व समाजवाद्यांना थोड्याबहुत प्रमाणात मान्य असल्यामुळे त्यास मान्यता मिळाली.

१९७७ च्या निवडणुकीत जनतापक्षाचा मोठा विजय झाला आणि जनसंघ (९०) व भालोद (८०) या गटांचे उमेदवार मोठ्या प्रमाणात निवडून आले. उत्तर भारतातील पक्षाच्या विजयाचे श्रेय चरणसिंगांनी आपल्याकडे घेतले. आता त्यांनी आपला रोख जगजीवनराम व बहुगुणा यांच्याकडे वळवला. कारण हे दोघे आपल्या पुढच्या राजकारणात अडथळे निर्माण करतील असे त्यांना वाटले. शिवाय ते नेहरूवादी होते. चरणसिंग आजारी पडल्यामुळे पक्षनेतेपदाची निवडणूक लढवू शकले नाहीत पण त्यांनी मोरारजी देसाईंना पाठिंबा देऊ केला. ज्या व्यक्तीने आणीबाणीचा ठराव लोकसभेत मांडला त्याला मी प्रधानमंत्री होऊ देणार नाही असे त्यांनी सांगितले. आपण गरीब शेतकऱ्यांचे प्रतिनिधी असल्यामुळे व मागासलेल्या जातीत जन्मलेले असल्यामुळे कोणीही आपले नाव पंतप्रधानपदासाठी सुचविले नाही याबाबत त्यांनी राग व्यक्त केला. मोरारजी देसाईंना प्रधानमंत्री पदासाठी पाठिंबा देऊन त्यांनी त्यांच्याकडून गृहमंत्रालय

व क्रमांक २ चे खाते घेतले. आता त्यांची नजर प्रधानमंत्रिपदावर स्थिरावली होती.

जगजीवनरामांचा पक्ष जनतापक्षात सामील झाला व चंद्रशेखर जनतापक्षाचे अध्यक्ष झाले. जून महिन्यात उत्तर भारतातील नऊ राज्यांच्या विधानसभांसाठी निवडणुका घोषित झाल्या. या निवडणुकांच्या मदतीने जनता पक्षात आपले स्थान बळकट करण्याचा चरणसिंगांचा विचार होता. याचकाळात इंदिरा गांधींचे आपणच खरे विरोधक आहो अशी हवा त्यांनी पसरवली व त्यांच्यावर न्युरेम्बर्ग पद्धतीचा खटला भरण्यात यावा अशी मागणी केली. जगजीवनराम व बहुगुणा यांच्याविरुद्ध त्यांनी आघाडी उभारली.

## चरणसिंगांचे सामाजिक महत्त्व

जून १९७७ मधील निवडणुका उत्तर भारतातील राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरल्या. या निवडणुकांद्वारे ही राज्ये मागासलेल्या मध्यम शेतकरी जातीसाठी जिंकण्याचा राजनारायण व चरणसिंग यांचा डाव होता. मधू लिमये यांनी भालोदची जनसंघाशी आघाडी जमवली. निवडणुकीत जनता पक्षाचा विजय झाला पण पक्षाच्या मतात घट झाली कारण ब्राह्मणांसारख्या उच्चवर्णीय जाती व हरिजनांनी पक्षास मते दिली नाहीत. पक्षाच्या मतात मार्च १९७७ च्या तुलनेत मोठीच घट झाली. भालोद व जनसंघ यांनी संघटना काँग्रेस आणि समाजवाद्यांच्या तोंडास पाने पुसली आणि मुख्यमंत्रिपदे आपापसात वाटून घेतली. हरियाना, बिहार, उत्तर प्रदेश व ओरिसा या राज्यात भालोदचे पुढारी मुख्य मंत्री झाले तर मध्यप्रदेश, राजस्थान व हिमाचल प्रदेश या राज्यात जनसंघाचे पुढारी मुख्य मंत्री झाले. भालोदचे तीन मुख्य मंत्री मागासलेल्या शेतकरी जमातीतून आलेले होते. चरणसिंग जनता पक्षाच्या राजकीय शक्तीचे प्रतीक बनले होते. जनता पक्षाचे निवडणूक चिन्ह नांगरधारी शेतकरी हे मुळात भालोदचे चिन्ह होते. जनता पक्षाने चरणसिंगांची विचारधारा जवळ जवळ स्वीकारली होती व सात राज्यांचे मुख्य मंत्री त्यांचे समर्थन करीत होते. चरणसिंगांचा हा उदय हरितक्रांतीपासून ज्यांचा फायदा झाला त्या वर्गाचा व जमातींचा उदय होता. वाढत्या राजकीय सहभागाचा, स्पर्धेचा आणि जागृतीचा तो परिणाम होता.

उत्तर भारतातील समाजरचना जातीव्यवस्थेच्या तीन स्तरात विभागलेली आहे. हे तीन वर्ग म्हणजे पुढारलेल्या जाती, मागासलेल्या जाती व अस्पृश्य. पुढारलेल्या जातीमध्ये ब्राह्मण, ठाकुर, कायस्थ, भूमिहार आणि राजपूत या जातींचा समावेश होतो. मागासलेल्या जातीत कुर्मी, कहार, जाट, गुजर, अहीर, यादव व कोयरी या मध्यम शेतकरी जाती समाविष्ट होतात. दलित जातीत चांभार, वाल्मिकी, दुसाध या जातींचा समावेश होतो. यामध्ये मागासलेल्या जातींची संख्या शे. ३५ च्या आसपास आहे. पुढारलेल्या जातींची संख्या शे. ३० च्या आसपास आहे. दलितांची संख्या शे. २० व मुसलमान व इतरांची संख्या शे. १५ च्या जवळपास आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सत्ता नेहमीच ब्राह्मण, राजपूत व कायस्थ या जातींच्या हातात राहिली. १९६० नंतर समाजवादी पक्षाच्या डॉ. राममनोहर लोहिया यांनी मागासवर्गाच्या उन्नतीसाठी आंदोलन सुरू केले. उत्तर भारतात मागासलेल्या जाती व दलितांनी एकत्र यावे असा सिद्धांत त्यांनी मांडला. त्यामुळे समाजवादी पक्षात कर्पुरी ठाकुर, रामसेवक यादव, मणीराम बागडी, रामनरेश यादव यांच्यासारखे मागास जातीतील पुढारी सामील झाले. डॉ. लोहियांच्या निधनानंतर राजनारायण या गटाचे पुढारी झाले. चरणसिंग पण याच जातीगटाचे पुढारी होते. १९७४ साली राजनारायण व चरणसिंग एकत्र आले आणि उत्तर भारतातील एक मोठा जातीगट संघटित होऊ लागला.

चरणसिंग महसूलमंत्री असताना त्यांनी कसेल त्याची जमीन हा सिद्धांत बऱ्याच प्रमाणात अमलात आणला. उत्तर प्रदेशात ब्राह्मण, ठाकुर व राजपूत हे सरंजामदारी जमीनदार मागे पडले आणि स्वतः शेती कसणाऱ्या जाती जास्त शक्तिशाली झाल्या. हरितक्रांतीमुळे या जातीतील जमीनदारांचा मोठा फायदा झाला. त्यांनी नवी खतं, नवी उत्पादनपद्धती व सरकारी मदत यांच्या साहाय्याने उत्पादनवाढ केली. बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे या वर्गाचा फायदा झाला, त्यामुळे १९६९ साली त्यांनी इंदिरा गांधीस पाठिंबा दिला. पण १९७३–७४ पासून ह्या जाती काँग्रेसपासून दूर सरकू लागल्या, कारण त्यांचे धान्य योग्य भावाने विकले जात नव्हते, खतं महाग झाली व कर्ज मिळेनाशी झाली. या जातीगटात राजकीय सहभागाची इच्छा निर्माण झाली, पण उत्तर भारतातील काँग्रेस पक्ष ब्राह्मण व तत्सम जातींनी ताब्यात घेतला होता. शिवाय हरिजनांचा पण काँग्रेसला पाठिंबा होता म्हणून हे जातीगट भालोदकडे वळले आणि भालोदमुळे जनता पक्षाकडे वळले. हरितक्रांती १९६७ साली सुरू झाली, पण तिचा राजकीय परिणाम अभिव्यक्त व्हावयास जवळ जवळ १० वर्षे लागली.

भारताच्या इतर भागात ब्राह्मणांची संख्या कमी असल्यामुळे १९५७–५८ च्या आसपास शेतकरी जातींच्या हातात सत्ता आली, पण या मागासलेल्या जाती नव्हत्या. त्या ब्राह्मणेतर असल्या तरी पुढारलेल्या जाती होत्या. त्यांचे पुढारीपण भारतीय राजकारणात महत्त्वाची भूमिका पार पाडू लागले. महाराष्ट्रात मराठा जातीगटाने १९५६–५७ साली सत्ता ताब्यात घेतली. कर्नाटकात लिंगायत, वक्कलिग; आंध्रामध्ये रेड्डी व कम्मा; ओरिसामध्ये करण; गुजरातमध्ये पटेल, पाटीदार; तमिळनाडूत नाडार, मोपनोर व इतर तत्सम जाती यांच्या ताब्यात सत्ता आली. यशवंतराव चव्हाण, निजलिंगप्पा, हनुमन्तैया, संजीव रेड्डी, ब्रह्मानंद रेड्डी, बिजू पटनाईक व कामराज नाडार यांच्यासारखे पुढारी राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका पार पाडू लागले. पण उत्तर भारतात बहुजन समाजाच्या हातात सत्ता येण्यास उशीर लागला. इतर राज्यात हा बदल काँग्रेस पक्षाच्या द्वारे झाला. पण उत्तरेत जनता पक्षाच्या मदतीने तो झाला. पण दरम्यानच्या काळात राजकीय परिस्थिती बदलली होती. राजकारण जास्त स्पर्धात्मक झाले होते.

कर्पुरी ठाकुर, देवीलाल व रामनरेश यादव यांनी सर्व मागासलेल्या मध्यम शेतकरी जातींना चरणसिंगांच्या पाठीमागे उभे करण्याचा प्रयत्न सुरू केला. दलित वर्गांत या काळात एक नवी जागृती झाली होती. आपला पुढारलेल्या जातीतील पाठिंबा कायम ठेवत इंदिरा गांधींनी या वर्गात नवी जागृती निर्माण केली होती. आणीबाणीच्या काळात काहींना जमिनी पण मिळाल्या होत्या. दलित जातीतूनच

मोठ्या प्रमाणात भूमिहीन शेतमजुरांचा पुरवठा होतो. या वर्गात निर्माण झालेली आपल्या अधिकारांबाबतची जागृती आणि नव्यानेच सत्ता हातात आल्यामुळे मागासलेल्या जातींना झालेला गर्व यामध्ये संघर्ष होणे अपरिहार्य होते. तशा संघर्षास सुरुवात झाली. बिहारमध्ये बेलची या गावी दलितांना जिवंत जाळण्यात आले. दलितांवर मोठ्या प्रमाणात हल्ले होऊ लागले. या परिस्थितीचा फायदा घेण्यास इंदिरा गांधी हजर होत्या. त्यांनी हरिजनांना आपल्या बाजूने संघटित करावयास सुरुवात केली आणि दलितांचा द्वेष्टा म्हणून चरणसिंगांवर हल्ले सुरू झाले. उत्तर भारतात नव्या सामाजिक संघर्षास सुरुवात झाली. जगजीवनराम व चरणसिंग यांच्यात मतभेद निर्माण झाले. स्पर्धात्मक राजकारणामुळे जातीगत व वर्गगत संघर्ष तीव्र झाले. जनता पक्षाने व कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी इंदिरा गांधींना व्यवस्थेबाहेर टाकण्याचा प्रयत्न सुरू करताच त्यांनी या जनसमूहांना संघटित करण्यास सुरुवात केली.

भारतातील इतर प्रांतांत पण असे अत्याचार होत होते. तमिळनाडूत किलावेनमणी येथे कित्येक दलितांना जिवंत जाळण्यात आले. महाराष्ट्रात गवईबंधूंचे डोळे काढण्यात आले व पुणे जिल्ह्यातील काही गावात त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला. पण याचा स्पर्धात्मक राजकारणाच्या दृष्टीने कोणी उपयोग करू शकले नाही. त्यासाठी इंदिरा गांधींच्या बंडखोर प्रतिमेचीच गरज होती.

या सर्व सामाजिक संघर्षास जन्म देत चरणसिंगांनी आपले सामाजिक महत्त्व सिद्ध केले. ते नव्या प्रगतिशील शेतकऱ्यांचे पुढारी बनले होते. जनता पक्षात ते सर्वांत शक्तिशाली आणि लोकप्रिय पुढारी होते. पक्षाचे सात मुख्य मंत्री त्यांच्या पाठीमागे होते. पक्षाचे ते प्रमुख विचारवंत (ideologue) बनले होते. जनता पक्षाचे नांगरधारी शेतकरी हे चिन्ह आपले प्रतिनिधित्व करीत आहे असे त्यांना वाटे. डिसेंबर १९७७ साली हजारो शेतकरी किसान मेळाव्यासाठी जमले; पण एवढे सारे असूनही आपण प्रधानमंत्री बनू शकलेलो नाही याची खंत त्यांना होती. त्यातच पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्या मदतीने भालोदची सरकारे पाडण्याचा प्रयत्न चरणसिंगांच्या विरोधकांनी केला; पण जनसंघ चरणसिंगांबरोबर राहिल्यामुळे हे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत; पण बहुगुणा व जगजीवनराम यांचे पाठीराखे म्हणून त्यांनी चंद्रशेखर यांना कायम विरोध केला.

## चरणसिंगांचे सत्तेचे राजकारण

जनसंघ–चरणसिंग यांची आघाडी बरेच दिवस टिकली. कारण दोघांना पण अशी भीती वाटत होती की, मोरारजी देसाई व जगजीवनराम कॉंग्रेस पक्षातील चव्हाण-ब्रह्मानंद रेड्डी यांच्या मदतीने आपणास पक्षातून बाहेर काढतील– कारण या पुढाऱ्यांशी चंद्रशेखर–जगजीवनराम यांचे जवळचे संबंध होते. म्हणूनच सुरुवातीच्या काळात राजनारायण यांनी पक्षातील कॉंग्रेसवाल्यांवर हल्ला चालू ठेवला.

१९७८ साली महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक व आसाम या चार राज्यांत निवडणुका झाल्या. ही चारी राज्ये जिंकण्याचा प्रयत्न चंद्रशेखर, जगजीवनराम व बहुगुणा यांनी केला. चरणसिंग–जनसंघ यांच्याविरुद्ध दक्षिणेत आपला पाया उभारण्याचा हा प्रयत्न होता. यावेळी जनता पक्षाने अनेक कॉंग्रेस पुढाऱ्यांना तिकिटे दिली; पण दक्षिणेत पक्षाचा पराभव झाला. चरणसिंगांनी पक्षनेतृत्वास याबाबत दोष दिला. राजनारायणांनी पक्षाच्या संघटनात्मक निवडणुका घेण्याची मागणी केली. त्यांचा रोख चंद्रशेखर यांच्यावर होता.

चरणसिंगांनी पक्षाच्या संसदीय मंडळाचा राजीनामा दिला. त्यांनी आपल्याच सरकारची षंढांचे सरकार म्हणून संभावना केली. सरकार इंदिरा गांधींवर कारवाई करीत नाही आणि मोरारजी देसाई इंदिरा गांधींचे संरक्षण करीत आहेत असे त्यांचे मत होते. मोरारजींनी ही संधी दवडली नाही. त्यांनी चरणसिंग व राजनारायण यांना सरकारमधून काढून टाकले. चरणसिंगांनी पक्ष सोडण्याची धमकी दिली; पण त्यावेळी २५ पेक्षा जास्त खासदार त्यांच्याबरोबर पक्ष सोडण्यास तयार नव्हते. त्यामुळे रडतखडत चरणसिंग पक्षात राहिले; पण त्यांच्या मनातील राग गेला नाही. ते पाठीमागून वार करू इच्छित होते.

याच काळात इंदिरा गांधींनी आझमगडची पोटनिवडणूक जिंकली. त्यानंतर त्यांनी चिकमंगळूरची निवडणूक जिंकली व लोकसभेत प्रवेश केला. डिसेंबर महिन्यात विशाल किसान संमेलन बोलावण्याचे चरणसिंगांच्या समर्थकांनी निश्चय केला. राजनारायण किसान संमेलनाचे अध्यक्ष बनले व त्यांनी देवीलाल व कर्पूरी ठाकुर यांच्या मदतीने किसान संमेलनाची संघटना बांधावयास सुरुवात केली. डिसेंबर महिन्यात लाखो शेतकरी दिल्लीला जमले आणि त्यांना ७५ लाखांची थैली हरियानाचे त्यावेळचे मुख्य मंत्री देवीलाल यांचे पुत्र ओमप्रकाश यांनी दिली. चरणसिंगांनी आपली लोकप्रियता दाखवून दिली. त्यांचे असे मत होते की, आझमगडमध्ये ते प्रचार करू शकले नाहीत म्हणून पक्षाचा पराभव झाला. समस्तीपूर आणि फत्तेपूर लोकसभा पोटनिवडणुकात त्यांनी पक्षाचा प्रचार केला आणि त्या जागा जनता पक्षाने जिंकल्या.

यामुळे जनता पक्षाच्या पुढाऱ्यांनी मोरारजींवर दबाव आणून चरणसिंगांना सरकारमध्ये घेण्याची मागणी केली. यातच जनसंघाचे पुढारीपण होते; पण याच काळात राजनारायण व मधू लिमये यांनी आर. एस. एस. वर हल्ले चालू केले. त्यांनी दुहेरी निष्ठेचा प्रश्न उत्पन्न करून जनसंघावर टीका केली. राजनारायणांनी मोरारजी देसाईंवर टीकास्त्र सोडले. मोरारजी देसाई जनसंघाच्या दबावापुढे झुकले व त्यांनी चरणसिंगांना सरकारमध्ये उपपंतप्रधान व अर्थमंत्री म्हणून नेमले. जनता पक्षातील वाद मिटला म्हणून लोकांनी निःश्वास टाकले.

## नवा राजकीय बनाव

चरणसिंग मंत्रिमंडळात सामील झाल्यानंतर राजनारायण यांनी सांगितले की, ते सरकारच्या बाहेर राहून व चरणसिंग सरकारमध्ये राहून मोरारजींचे सरकार उद्ध्वस्त करतील. त्यावेळी राजनारायणांना कुणीच गंभीरतापूर्वक घेतले नाही; पण चरणसिंगांनी त्यांच्या नव्या राजकीय साहसास सुरुवात केली. रामनरेश यादव यांनी जनसंघाच्या दोन मंत्र्यांना काढून टाकले. हरियानात पण देवीलाल यांनी तेच केले. राजनारायणांनी जनसंघावर हल्ला चालूच ठेवला. भालोद व जनसंघ या दोन गटांत भांडणास सुरुवात झाली.

जनसंघाने भालोदच्या तीन्ही मुख्यमंत्र्यांना खाली खेचण्याचा निर्णय घेतला आणि संघटना कांग्रेस, लोकशाहीवादी कांग्रेस व समाजवादी यांच्या मदतीने तो पार पाडला; पण याकाळात चरणसिंगांनी जॉर्ज फर्नांडिसना आपल्या गटात ओढले. रामनरेश यादवांचा पराभव झाल्यावर त्यांनी बहुगुणांना आपल्या गटात ओढले; पण त्यांचे तीन मुख्य मंत्री पदच्युत झाले. याच काळात चरणसिंगांनी केंद्रीय अंदाजपत्रक मांडले. या अंदाजपत्रकात ग्रामीण भागावर जास्त खर्च करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शहरी भागातील लोकांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंवर कर लादून त्यांनी त्या भागात असंतोष निर्माण केला. या अंदाजपत्रकामुळे किंमती भडकल्या. सहा महिन्यांतच सर्व वस्तूंचे भाव जवळजवळ पंधरा ते वीस टक्क्यांनी वाढले.

याच काळात मोरारजी सरकार खूप बदनाम झाले. पोलिसांनी केलेले बंड मोडण्यासाठी सैन्याचा वापर करण्यात आला. मोरारजींच्या मुलावर भ्रष्टाचाराचे आरोप ठेवण्यात आले. मोरारजींचे मंत्रिमंडळ अकार्यक्षम मंत्र्यांनी भरलेले होते. कोळशाच्या टंचाईमुळे मोठ्या प्रमाणात ऊर्जा टंचाई निर्माण झाली. रेल्वे कर्मचाऱ्यांनी बोनसची मागणी केली व संघटित मजुरांनी आपल्या चळवळी उभारल्या. बऱ्याच ठिकाणी संपपण झाले. मे–जून महिन्यात मोरारजी सरकार लोकांच्या मनातून उतरले होते.

चरणसिंगांच्या वतीने राजनारायण एका नव्या राजकीय बनावाच्या प्रयत्नात होते. त्यासाठी त्यांनी संजय गांधींची पण मदत घेतली. देवराज अरस यांनी इंदिरा कांग्रेसचा राजीनामा दिला आणि ते कांग्रेसमध्ये सामील होण्याबाबत विचार करू लागले. चरणसिंगांप्रमाणेच ते पण मागासलेल्या जातींचे प्रतिनिधी होते. इंदिरा कांग्रेसला उच्च जातींचा पाठिंबा असल्यामुळे उत्तर भारतातील मागास जातीतील पुढारी कांग्रेसमध्ये राहिले होते. बिहारात रामलखनसिंग यादव व दरोगाप्रसाद राय, उत्तर प्रदेशात चंद्रजित यादव व लक्ष्मीशंकर यादव हे हळूहळू चरणसिंगांच्या बाजूने सरकत होते. अरस यांच्या पक्षबदलामुळे नवा राजकीय बनाव मांडता येईल असे राजनारायण व इतर नेत्यांना वाटले. चरणसिंग, अरस, चव्हाण आणि ब्रह्मानंद रेड्डी यांना पाठिंबा देणारा वर्ग जवळजवळ सारखाच असल्यामुळे त्यांनी एकत्र यावे अशी कल्पना राजिंदर पुरी यांनी मांडली. लोकमताची चाचपणी म्हणून बिहारमध्ये कर्पुरी ठाकूर यांनी कांग्रेस पक्षाच्या मागासजातीय उमेदवारास गुप्त पाठिंबा दिला आणि तो निवडून आला. हरियानात पण किसानसमेलनाचा उमेदवार जनता पक्षाच्या उमेदवाराचा पराभव करून निवडून आला. तिसऱ्या शक्तीची कल्पना मधू लिमये यांनी मोठ्या उत्साहाने मांडली व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा त्यास पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. चरणसिंग जर जनता पक्षातून बाहेर पडत असतील तर त्यांना पाठिंबा देण्याची तयारी इंदिरा गांधींनी दर्शविली.

आर. एस्. एस्. ची भीती जनता पक्षात जवळजवळ सर्वांना वाटते. जनसंघाच्या रूपाने आर. एस्. एस्. आपले प्रभावक्षेत्र तयार करीत आहे असे राजनारायण यांचे म्हणणे होते. पक्षाच्या संघटनात्मक निवडणुकात जनसंघाने भालोदला मागे टाकले. मागे जे राजनारायण संघटनात्मक निवडणूक घेण्याचा आग्रह करीत होते त्यांनी आता आपला पराभव होणार हे पाहून निवडणुका रद्द करण्याची मागणी केली तर मधू लिमयांनी निवडणुकांनाच विरोध केला. जनता पक्षात संघाच्या आचार व विचारप्रणालीबाबत बराच राग होता. जातीय दंग्यामुळे व नानाजी देशमुखांच्या आक्रमक राजकारणामुळे परिस्थिती बरीच चिघळली होती. नानाजी देशमुख, वीरेन्द्रकुमार सकलेचा, सुंदरसिंग भंडारी व सुब्रह्मण्यम् स्वामी यांच्या वागणुकीमुळे पक्षात जनसंघविरोधी वातावरण होते. त्यातच जनसंघाचा पाठिंबा घेऊन मिंधे झालेले मोरारजी देसाई व चंद्रशेखर दुहेरी निष्ठेबाबत निर्णय घेण्यास उशीर लावीत होते. चंद्रशेखर यांनी याबाबत वेळीच निर्णय घेतला असता, तर कदाचित् बहुगुणा व पटनाईक यांनी चरणसिंगांना साथ दिली नसती. पण आपण ज्वालामुखीच्या शिखरावर बसलो आहोत याची मोरारजींना जाणीव नव्हती.

## चरणसिंग प्रधानमंत्री बनतात

जुलै महिन्यात जे झाले ते सर्वांना माहीत आहे. मोरारजी देसाईंना पाठीमागून वार करून चरणसिंगांनी पदच्युत केले. जवळजवळ ९५ खासदारांनी जनता पक्ष सोडला. त्यात बहुगुणा, पटनाईक व जॉर्ज फर्नांडिस यांचा समावेश होता. या काळात मोरारजी देसाईंनी आपल्या राजकीय अकार्यक्षमतेचा कळस गाठला. कदाचित नेहरूयुगाच्या राजकारणाशी त्यांचे नाते जवळचे असल्यामुळे त्यांनी इंदिरायुगातील राजकारणाच्या पद्धतीचा वापर केला नाही. या काळात सर्वच राजकीय पुढारी बेशरमपणाने वागले. चरणसिंगांना इंदिरा कांग्रेसने पाठिंबा देऊ केला. इंदिरा गांधींविरुद्ध रात्रंदिवस शंख करणारे राजनारायण, मधु लिमये व जॉर्ज फर्नांडिस व कांग्रेसचे पुढारी यांची त्याबाबत काहीच हरकत नव्हती. मोरारजींना काढून टाकण्याचे त्यांचे स्वप्न साकार झाले.

मोरारजींनी नेतेपदाचा राजीनामा न देता ते त्या पदास चिकटून राहिले. त्यांना जगजीवनरामांना प्रधानमंत्री बनू द्यायचे नव्हते. जगजीवनराम यांना जास्त पाठिंबा होता. राष्ट्रपतींनी चरणसिंग व मोरारजी या दोघांना आपल्या याद्या सादर करण्यास सांगितले. चरणसिंगांच्या पाठीमागे त्यावेळी २५० खासदार होते व मोरारजींच्या मागे २३८ पण बहुमतासाठी २७२ खासदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता होती. यावेळीच राष्ट्रपतींनी लोकसभा विसर्जित करावयास पाहिजे होती. पण राष्ट्रपतींना महत्त्वाची राजकीय भूमिका पार पाडायची होती. म्हणून त्यांनी बहुमत नसतानाही चरणसिंगांना प्रधानमंत्री बनविले आणि तीन आठवड्यांत विश्वासदर्शक ठराव संमत करून घेण्याचे सांगितले. या सर्व पेचप्रसंगात राष्ट्रपतींची वागणूक घटनात्मक तरतुदी व राजकीय सुज्ञता यापासून बरीच दूर होती. मोरारजी देसाईंना काळजीवाहू प्रधानमंत्री म्हणून काम न करू देण्याचा यामागे उद्देश होता हा पिलू मोदी यांचा आरोप बरोबर वाटतो. एखादा निःपक्षपाती राष्ट्रपती असता तर चरणसिंग प्रधानमंत्री बनू शकले नसते. चरणसिंग प्रधानमंत्री झाल्यावर मोरारजींनी राजीनामा दिला व जगजीवनराम विरोधी पक्षाचे नेते झाले.

सत्तेच्या मदतीने चरणसिंग आपले स्थान बळकट करीत आहेत हे इंदिरा गांधींना माहीत होते. त्यांनी वेळ येताच चरणसिंग सरकारला

पदच्युत केले. त्यांचा मुख्य उद्देश मोरारजींचे सरकार पाडणे व जनता पक्षास फोडणे हा होता. तो त्यांनी साध्य केला. चरणसिंगांनी राष्ट्रपतींना लोकसभा विसर्जित करण्याचा सल्ला दिला. हा सल्ला राष्ट्रपतींनी मानला व चरणसिंगांना डिसेंबरपर्यंत काळजीवाहू प्रधानमंत्री म्हणून नेमले.

चरणसिंगांनी या काळात आपली जनसंघविरोधी आघाडी जास्त शक्तिशाली केली. त्यांना माहीत होते की, जनसंघाविरुद्ध आघाडी उभारून सर्व डावे एकत्र करता येतात. त्यांनी कॉंग्रेस, डावे कम्युनिस्ट, उजवे कम्युनिस्ट, मुस्लिम लीग, फारवर्ड ब्लॉक, शेकाप व रिसोपा या पक्षांना आपल्या नेतृत्वाखाली आणले. ही किमया त्यांनी मधु लिमये व राजनारायण यांच्या मदतीने घडवून आणली. जनता पक्षातील हेमवतीनंदन बहुगुणा, मधु लिमये, पटनाईक व जॉर्ज फर्नांडिस यांना त्यांनी आपले नेतृत्व स्वीकारावयास लावले. यामुळे यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या वरिष्ठ कॉंग्रेसनेत्यासपण त्यांचे नेतृत्व मान्य करावे लागले. सुब्रह्मण्यम, ब्रह्मानंद रेड्डी व देवराज अरस यांनीपण त्यांचे नेतृत्व मान्य केले. एवढेच नाही तर उजव्या व डाव्या साम्यवादी पक्षांनी पण त्यांच्या नेतृत्वास मान्यता दिली.

सप्टेंबर महिन्यात त्यांनी लोकदल या नावाच्या नव्या पक्षाची स्थापना केली. १९६७ नंतरचा हा चरणसिंगांचा सहावा पक्ष. या पक्षात कॉंग्रेसला गोवण्याचा त्यांचा प्रयत्न सफल झाला नाही. पण जॉर्ज फर्नांडिस, मधु लिमये हे त्यांना नवे सहकारी मिळालेले आहेत. १९८० च्या निवडणुकांमध्ये इंदिरा गांधी व जगजीवनराम यांच्या कॉंग्रेस व जनता पक्षांशी टक्कर देण्यासाठी चरणसिंगांनी शक्तिशाली मोर्चे बांधले आहेत. त्यातच त्यांच्या हातात सत्तापण आहे. जानेवारी १९८० मध्ये होणाऱ्या तुंबळ निवडणूक युद्धात चरणसिंग हे एक महत्वाचे सेनानी आहेत. जगजीवनराम व इंदिरा गांधी यांच्या इतक्याच कुशल व चाणाक्ष पुढाऱ्यांची त्यांना साथ आहे व यशवंतराव चव्हाण, देवराज अरस यांच्यासारखे कॉंग्रेसनेते त्यांच्या पाठीमागे उभे आहेत. या त्रिकोणी लढतीत कोणता पक्ष विजयी होईल हे सांगणे अवघड बनले आहे.

## एक मूल्यांकन

चरणसिंगांच्या राजकीय जीवनाचा हा आलेख आहे. इंदिरा गांधींचा अपवाद वगळता कोणत्याही इतर नेत्याने हे साध्य केलेले नाही. त्यांनी हे खरे गेल्या बारा वर्षांत घडवून आणले. भारतात नव्याने उदयास येणाऱ्या शेतकरी वर्गाचे पुढारपण स्वीकारून त्यांनी प्रधानमंत्रिपद गाठले. आपले सामर्थ्य अचूकपणे हेरत, विरोधकांच्या कमजोरीवर हल्ले करीत आणि वेगवेगळ्या वैचारिक भूमिकांवर जोर देत त्यांनी हा प्रवास केला. त्यांना लोकांचा पाठिंबा असल्यामुळे १९७१ व १९७४ साली ते पराभूत झाले तरी ते चंद्रभानू गुप्तांप्रमाणे खच्ची झाले नाहीत. संधी मिळताच तोंड वर काढले. त्यांचे अनेक सहकारी—जयराम वर्मा, श्रीपती मिश्र, उदीत नारायण शर्मा, प्रकाशवीर शास्त्री त्यांना सोडून गेले; (१९७७ मधील त्यांच्या सहकाऱ्यांपैकी फक्त रामबचन यादव त्यांच्याबरोबर आहेत) पण त्यांनी नवे पुढारी जमविले. त्यांच्या सामर्थ्यात फरक पडला नाही. कारण त्यांचे पाय पश्चिम उत्तर भारतात पक्के रोवलेले होते.

चरणसिंग बारा वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशातील मंत्रिमंडळात एक साधे मंत्री होते व यशवंतराव चव्हाण त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. मागील बारा वर्षांत चरणसिंगांनी स्वतःच्या सामर्थ्याच्या जोरावर प्रधानमंत्रिपद मिळविले. आघाड्यांचे राजकारण करीत त्यांनी आपले सामर्थ्य वाढविले आणि निरनिराळ्या वैचारिक भूमिका लोकांपुढे स्पष्ट करीत, लोकमत बनवीत त्यांनी आपले नेतृत्व प्रस्थापित केले. हे त्यांनी मोरारजी देसाई, जगजीवनराम व चव्हाण यांच्यासारख्या कॉंग्रेसच्या कुबड्या घेऊन केले नाही तर स्वतःच्या राजकीय सामर्थ्याच्या बळावर केले.

स्वतः चरणसिंगांचे वैयक्तिक चारित्र्य निष्कलंक व शुद्ध आहे, पण त्यांच्या राजकीय चारित्र्याबाबत ते म्हणता येत नाही. ते जरी तत्त्वनिष्ठेच्या गोष्टी सांगत असले तरी त्यांच्या राजकारणात तत्त्वांना मूल्य म्हणून फारसे स्थान नाही. ते स्पर्धात्मक राजकारणात चाललेल्या सत्तासंपादनाच्या खेळात कुशल आहेत. त्यासाठी ते सारख्या भूमिका बदलतात. मुळात ते साम्यवाद्यांचे विरोधक पण आज ते त्यांचे मित्र आहेत. जनसंघाबरोबरच त्यांनी गेली बारा वर्षे घालवली आहेत; पण आज जनसंघ त्यांचा शत्रू झाला आहे. त्यांच्या इंदिरा गांधींच्या विरोधाला पण तसा अर्थ नाही कारण प. नेहरूंच्या मृत्यूनंतर भारताच्या राजकारणात 'नव्या नीतिमत्ते'चा उदय झाला. या नव्या तत्त्वज्ञानात साध्य महत्त्वाचे होते. साधनांना फारसे महत्त्व नव्हते. सत्तासंपादनाची स्पर्धा तीव्र झाल्यामुळे महत्त्वाची पदे बळकावण्याचा प्रत्येक गट प्रयत्न करत होता. यातूनच पक्षांतराच्या राजकारणाचा उदय झाला. नव्या राजकीय नीतिमत्तेचा तो मोठा आविष्कार होता. चरणसिंग या नव्या नीतिमत्तेचे महत्त्वाचे उद्गाते. यातूनच आणीबाणीचा पण जन्म झाला. चरणसिंगांचे राजकारण हे नीतिशून्य सत्तावादावर आधारलेले आहे. त्यांनी त्यास दिलेला आत्मगौरवी नीतिवादाचा मुलामा तकलादू आहे.

चरणसिंगांना आपण इंदिरा गांधी, जगजीवनराम, मोरारजी देसाई यांच्यासारखे भ्रष्ट नाही याचा अभिमान आहे. पण देवीलाल यांचे पुत्र ओमप्रकाश यांच्याकडून ७५ लाखाची थैली स्वीकारताना त्यांना काहीच वाटत नाही. राजनारायण व संजय गांधी यांच्या चुंबाचुंबीस त्यांचा आशीर्वाद होता. चरणसिंगांचे राजकीय चारित्र्य फारसे उज्ज्वल नाही कारण संधीसाधूपणा हा त्यांचा स्थायीभाव आहे; पण ते नव्या नीतीचे प्रवर्तक आहेत.

चरणसिंगांच्या राजकीय कसबाचे काही गुण आपण पाहिले. पण त्याबरोबरच त्यांच्यामध्ये काही ठळक दोष पण आहेत. या दोषांमुळेच ते एक शक्तिशाली राजकीय पक्ष स्थापन करू शकले नाहीत. त्यांचा स्वभाव हट्टी व एककल्ली आहे. त्यांना आपल्या बरोबरीच्या सहकाऱ्यांबरोबर काम करता येत नाही. राजकारणात ते आक्रमण करू शकतात पण माघार त्यांना फारशी जमत नाही. आपली सत्ता स्थिर करण्यापेक्षा इतरांची सत्ता नष्ट करण्यात व परिस्थिती सतत अस्थिर ठेवण्यात त्यांचा हात कोणीच धरू शकणार नाही. म्हणूनच ते राजीनाम्याच्या नेहमी धमक्या देत असतात. ते आघाड्या उभारू शकतात पण या आघाड्या दीर्घकाळ टिकविण्याबाबत ते फारसे प्रसिद्ध नाहीत. ते आपली प्रतिक्रिया मोजक्या शब्दात व्यक्त न

करता भडक शब्दात व्यक्त करतात व स्वत:च गोत्यात येतात. म्हणून चरणसिंग प्रधानमंत्री म्हणून पुन्हा वापस आले त तेरी फार काळ टिकू शकणार नाहीत.

चरणसिंगांच्या विचारसरणीवर उजव्या विचारांचा दाट प्रभाव आहे. जुन्या ब्रिटिशधार्जिण्या जमीनदारांच्या विचारांचा प्रभाव आहे. त्याबराबर आर्यसमाजाचा सनातनीपणा व नव्या जमीनदार वर्गाचा कम्युनिस्टविरोधपण त्यांच्या विचारात आढळतो. सध्या त्यांनी लोकदल, काँग्रेस, उजवे व डावे साम्यवादी, रिसोप, फारवर्ड ब्लॉक, शेकाप यांची आघाडी उभारली आहे. त्यांच्या पक्षास बहुमत मिळेल की नाही हे सांगणे आज अवघड आहे. पण ही आघाडी एक शक्तिशाली पर्याय म्हणून उभी राहिली आहे. त्याचा मुख्य मुकाबला इंदिरा गांधींशी होणार आहे. त्या विरोधी पक्षातील फुटीमुळे जास्त शक्तिशाली झालेल्या आहेत. चरणसिंगांची आघाडी अंतर्विरोधाने परिपूर्ण अशी आहे. या आघाडीला २७५ जागा मिळाल्या तरीही लोकदलाचा वाटा त्यात १००-११० जागांपेक्षा जास्त असणार नाही कारण पक्षास फक्त तीन राज्यात पाठिंबा आहे. यात डाव्या पक्षाचे ७०-८० खासदार असल्यामुळे अंतर्भेद जास्त वाढण्याची शक्यता पण आहेच कारण चरणसिंग इंदिरा गांधी यांच्यासारखा एकसंघ पक्ष निर्माण करू शकत नाहीत. शिवाय आज जरी चरणसिंग जनसंघाच्याविरुद्ध असले तरी हे दोन्ही गट निवडणुकीनंतर एकत्र येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सध्या इंदिरा गांधी व जगजीवनराम यांच्याशी चरणसिंग यांचा मुकाबला आहे. हे दोघेही कूटनीतीमध्ये चरणसिंग यांच्यापेक्षा जास्त प्रवीण आहेत. दोघेही त्यांच्यासारखेच लोकप्रिय आहेत. दोघे एकत्र झाले तर चरणसिंगांना अवघड जाईल. पण चरणसिंगांनी लोकदलाची स्थापना करून एका नव्या राजकीय साहसास सुरुवात केली आहे. ते यशस्वी होते की नाही हे पहाण्यासाठी आपण जानेवारी १९८० पर्यंत थांबणे इष्ट ठरेल. ☐


## -New titles received-

1 : The Scope of Happiness-( Memoirs )-
Vijaya Laxmi Pandit — Rs. 125 / -

2 : The Pigeon Project-( Bestseller-Thriller ) -
Grving Wallace — Rs. 35 / -

3 : The Two-( The Story of the Siamese Twins
Chang & Eng ) Grving Wallace
& Amy wallace

4 : Indira Gandhi Returns- ( Politics)
Khushwant Singh — Rs. 35 / -

5 : Indira Gandhi and Her Power Game-(Politics)
Janardan Thakur — Rs. 35 / -

6 : The Immigrants-( Bestseller-novel )-
Howard Fast — Rs 23 / -

7 : Exit Sherlock Holmes-( Brand New Sherlock
Holmes Story ) Robert Lee Hall — Rs. 17.50 / -

8 : Figuring : The Joy of Numbers-( The
Mathematical wizard shows some tricks )
Shakuntala Devi — Rs 15.65 / -

* Another bout of inflation is around the Corner. Do not Save Money. Buy a long term membership of Phoenix. Life-membership is the Cheapest !

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.**

डॉ. वसंत देशपांडे

मानवेंद्रनाथ रॉय चरित्र

# केवळ ' प्रबोधन ' पुरेसे आहे काय?

भारताच्या राजकीय इतिहासात मानवेंद्र रॉय हे एक प्रतिभासंपन्न आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेले कृतिशील विचारवंत कायमचे स्थान पटकावून बसलेले आहेत. आजही भारतातील अनेक तरुण कार्यकर्त्यांना मानवेंद्र रॉय यांचेविषयी विलक्षण आकर्षण आणि औत्सुक्य आहे. रॉय यांची वैशिष्टचे मनाची पकड घेणारी आहेत. वैचारिक क्षेत्रात एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास, स्वातंत्र्यसंग्रामात सशस्त्र उठावासाठी झोकून दिलेले आयुष्य, मार्क्सवादाची पकड मनावर बसल्यानंतर दलित शोषित वर्गाची बांधणी करण्यासाठी केलेली धडपड, विपुल संपन्न लेखन, दीर्घकाळ तुरुंगवास आणि अखेरपर्यंत प्रसन्न मनाने मानवाच्या मुक्तीसाठी चालवलेला संग्राम या सर्व वैशिष्टचांमुळे रॉय हे अनेकांचे स्फूर्तिस्थान बनले. रॉय यांचे विचारधन संकलित झालेले आहे. त्याचा अभ्यास करून त्यावर विपुल लेखन झालेले आहे. त्यांची विचारसरणी मानणाऱ्यांचा एक लहानसा पण प्रभावी पंथही अस्तित्वात आला. अशा या व्यक्तीचे राजकीय दृष्टिकोनातून विस्तृत चरित्र लिहून श्री. कर्णिक यांनी एक बहुमोल कामगिरी पार पाडली आहे. अशा चरित्राची गरज फार दिवसांपासून वाटत होती. ही जबाबदारी फार मोठी होती. यासाठी मानवेंद्र रॉय यांच्या वैचारिक विश्वाचा चांगला जवळून परिचय असणे आवश्यक होते. श्री. कर्णिक यांनी ही जबाबदारी स्वीकारली आणि समर्थपणे पार पाडली यात संशय नाही.

हा ग्रंथ आकाराने मोठा आहे. पण ग्रंथ वाचल्यावर हे अटळ होते हे लक्षात येते. ग्रंथाचे तीन प्रमुख भाग केले आहेत. रॉय यांच्या जीवनातील महत्त्वाचे टप्पे लक्षात घेऊन हे भाग केलेले आहेत. पहिल्या भागात मानवेंद्र यांची कम्युनिस्ट विचारप्रणालीपर्यंतची वाटचाल दिलेली आहे. दुसऱ्या भागात कम्युनिझमविषयी भ्रमनिरास होऊन रॉय मानवतावादाकडे कसे वळले याचा तपशील आहे. तिसऱ्या भागात मानवतावाद अधिक संपन्न कसा होत गेला याचा तपशील व ऊहापोह आहे.

कलकत्त्यानजीक एका लहान खेड्यात एका भिक्षुकाचे कुटुंबात १८८७ साली मानवेंद्र रॉय यांचा जन्म झाला. अगदी लहान वयातच रॉय यांना देशमुक्तीचा ध्यास लागला. त्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याची त्यांची मानसिक तयारी होती. त्या काळच्या बंगालमधील क्रांतिकारक वातावरणात रॉय यांना सशस्त्र उठावाचे आकर्षण वाटल्यास नवल नाही. कोणत्याही मार्गाने दारूगोळा आणि शस्त्रास्त्रे मिळवावीत आणि उठाव करून ब्रिटिशांना हुसकावून लावावे हा विचार रॉय यांचे मनात रुजला आणि त्यासाठी कोणताही धोका पत्करण्याची त्यांची तयारी झाली. या कार्यातील, परदेशातून शस्त्रास्त्रे मिळवण्याची महत्त्वाची कामगिरी रॉय यांनी स्वीकारली व त्यामागे ते लागले. या उद्योगातूनच त्यांची जगभर भ्रमंती सुरू झाली. पण शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी गेलले रॉय नवीन विचारांचे धडे घेऊ लागले त्यांच्या विचारात महत्त्वाचे बदल होऊ लागले. केवळ ब्रिटिशांना हाकलणे म्हणजेच स्वातंत्र्य मिळवणे काय? हा प्रश्न त्यांच्या मनात घर करून राहिला. त्याच्या उत्तराचा शोध त्यांना मार्क्सवादात मिळाला. भारतीयांचे स्वातंत्र्य म्हणजे केवळ ब्रिटिशांपासून मुक्तता नव्हे; तर समाजाचे संपूर्ण परिवर्तन होऊन समाज विषमता आणि शोषण यापासून मुक्त झाला पाहिजे हे त्यांना कळून चुकले. समाजातील मूठभर लोकांची मिरासदारी कायम राहिली तर राजकीय स्वातंत्र्याला अर्थ नाही हा विचार मनात रुजला. रॉय यांना नवीन विचार कार्ल मार्क्सच्या अभ्यासातून मिळाले. रशियातील क्रांतीने रॉय यांना उत्साह आला आणि एकाच वेळी राजकीय, आर्थिक व सामाजिक क्रांती शक्य आहे व त्यासाठीच प्रयत्न करावयास हवेत याबद्दल त्यांना खात्री वा लागली. मेक्सिकोमधील महत्त्वाची कामगिरी संपवून रॉय रशियाला गेले. आपल्या बुद्धिमत्तेमुळे व संपन्न व्यक्तिमत्त्वामुळे ते रशियाच्या क्रांतीने त्यावर छाप पाडू शकले व त्याच्याशी बरोबरीच्या नात्याने विचारांची देवाणघेवाण करू लागले. त्यांची कर्तबगारी पाहून लेनिनने त्यांना चीनला पाठवले व तेथील क्रांतिकार्यास मार्गदर्शन करण्याची महत्त्वाची कामगिरी त्यांचेवर सोपविली.

रॉय यांच्या जीवनातील हा सर्वच

इतिहास रोमांचकारी आहे. श्री. कर्णिक यांनी हा इतिहास फार तपशिलात जाऊन दिलेला आहे. काही नव्याने उपलब्ध झालेल्या कागदपत्रांचा दाखला त्यांनी दिला असल्या- मुळे पुस्तकाचा हा भाग महत्त्वाचा ठरतो.

साम्यवादाबाबत रॉय यांचा भ्रमनिरास झाला. त्याचे प्रमुख कारण स्टॅलिनची क्रूर दडपशाही. लेनिनच्या मृत्यूनंतर सत्तास्पर्धेत मानवी मूल्यांचा चक्काचूर झाला; या वृत्ती- मुळे रॉय वैतागले. आपल्या विचारसरणीचा पुन्हा एकदा प्रथमपासून फेरविचार करण्याची गरज आहे असे त्यांना वाटू लागले. संपूर्ण विचार तपासून पाहून आवश्यक ते बदल करण्याची तयारी असणे यासाठी मनाचा फार मोठेपणा आणि प्रांजळपणा लागतो, फार थोडचा लोकांजवळ ही मानसिक ताकद असते. रॉय हे अशा तुरळक लोकांपैकी एक आहेत.

रॉय साम्यवादापासून मानवतावादाकडे ( रॅडिकल ह्युमॅनिझम ) वळले. वास्तविक हा वैचारिक बदल फार महत्त्वाचा आहे. या संक्रमणाचे विश्लेषण पूर्णपणे झाले आहे असे म्हणता येत नाही. एका दृष्टीने हे वैचारिक संक्रमण साहजिकच वाटते. विचारवंत कोण- तीही विचारप्रणाली स्वीकारतो तेव्हा त्याच्या डोळ्यापुढे सामान्य माणसाची प्रगती, सुख, स्वातंत्र्य असते. या सामान्य माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या पूर्ण विकासासाठी समतेवर आधारलेली, शोषणरहित अशी सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था प्रामाणिक विचारवंतांना हवी असते. अशी व्यवस्था साम्यवादामध्ये मिळेल असे रॉय यांना प्रथम वाटले. रशियामधील साम्यवादाचा प्रत्यक्ष अवतार पाहिल्यानंतर त्यांना या विचार- प्रणालीत उणिवा दिसू लागल्या. त्यांचा विचार करीत असतानाच ते मानवतावादाकडे झुकले.

रॉय यांचा रॅडिकल ह्युमॅनिझम आकर्षक वाटला तरी तो पूर्ण आहे असे मात्र वाटत नाही. त्यात नवीन दिशा शोधण्याची धडपड आहे; परंतु या विचारांना परिपूर्णता प्राप्त झाली आहे असे म्हणता येणार नाही. श्री. कर्णिक, रॉय यांची नवीन विचारप्रणाली सांगताना त्याचा चिकित्सक दृष्टीने आढावा घेत नाहीत. रॉय यांचे विचार ते सांगतात, रॉय यांचे उतारे देतात. त्यात तोचतोचपणा अटळपणे येतो. पण त्याची सुसंगत मांडणी न दिल्याने आणि चिकित्सा टाळल्याने हा पुस्तकाचा भाग मनाची पकड घेत नाही.

## माणसाची मूलप्रकृती

रॉय यांच्या नवीन विचारास प्रारंभ होतो तो मूळ मनुष्यधर्म समजावून घेण्याच्या त्यांच्या प्रयत्नात. मूळात माणसाची मान- सिक, बौद्धिक ठेवण कशा प्रकारची आहे ? रॉय यांचे मते माणूस मुळात श्रद्धाळू ( Believe ) नाही; विवेकी ( rational ) आहे आणि म्हणूनच तो न्यायी आहे. परंतु हा त्यांचा मूळ स्वभाव सुप्तावस्थेत आहे. त्यास आवाहन करून हा त्यांचा मूळ स्वभाव व प्रकृती जागृत करावयास हवी. हे कसे करावयाचे ? निवडणुकीच्या काळात काही निवडक ठिकाणी हा प्रयत्न करावा. मतदान करण्यापाठीमागे प्रत्येकाने विचारपूर्वक मत द्यावे मग ते कोणासही दिले तरी चालेल. मतदाराने उमेदवारास परखड प्रश्न विचारले पाहिजेत. समाजवादाची नेमकी कल्पना काय ? सामाजिक न्याय मिळण्यासाठी नेमक्या योजना कोणत्या ? इत्यादी प्रश्न विचारून उमेदवाराची तपासणी करावयास हवी. त्याचा प्रामाणिकपणा तपासून पहावयास हवा. अशी सवय लागली म्हणजे लोकशाही मूळ धरू लागेल. या दृष्टीने समाजाचे प्रबो- धन व प्रत्यक्ष कार्य कार्यकर्त्यांनी हाती घ्यावे असे रॉय यांचे आवाहन होते. सामान्य नागरिकाची विवेकशक्ती जागृत झाली म्हणजे लोकशाही मार्गाने, व्यक्तीचे महात्म्य राखून, समाजवादी व्यवस्था निर्माण करणे शक्य होईल अशी रॉय यांना आशा होती. विवेकशक्ती जागृत असेल तर माणूस स्वार्थी राहू शकत नाही. स्पर्धेपेक्षा सहकार त्याला आवश्यक वाटू लागतो. हावरटपणापोटी दुसऱ्यास लुबाडण्याची, त्याला आपल्या कह्यात ठेवण्याची आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वावर आपली छाया टाकण्याची प्रवृत्ती आपोआप नष्ट होते. रॉय यांनी हा निष्कर्ष त्यांच्या अखंड चिंतनातून काढलेला आहे. रशियामध्ये समाजवादी क्रांती होऊन देखील भयानक स्वरूपाची हुकूमशाही आली याचे कारण रॉय यांचे मते सामान्य माणसाची विवेक- शक्ती जागृत करण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत, हे होय. झारशाही, हिटलरशाही, स्टॅलिनशाही इत्यादीत रॉय फरक करीत नाहीत. कम्युनिस्ट राष्ट्रांच्या पुढाऱ्यांवर विश्वास ठेवू नका असे रॉय सांगत राहिले. पं. नेहरू जेव्हा चीनच्या पुढाऱ्यांवर विश्वास टाकून भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणाला वळण देऊ पहात होते तेव्हा रॉय यांनी त्यांच्यावर कडाडून हल्ला केला. असा विश्वास टाकण्यात नेहरूंचा भाबडेपणा दिसतो, शहाणपण किंवा मुत्सद्देगिरी दिसत नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. नेहरू यांची निवडणुकीच्या काळातील भाषणे रॉय यांना हुकूमशाहीप्रवृत्तीची वाटत होती. म्हणून त्यांचा आग्रह अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात येण्यावर होता आणि सामान्य माणसाच्या प्रबोधनावर होता. या देशात लोकशाही अयशस्वी ठरली तर रॉय यांच्या मते त्याचे महत्त्वाचे कारण राजकीय पुढारी, भांडवल- दार इत्यादींचे संगनमत, कपट हे नसून सामान्य माणसाच्या मनाची ठेवण हे राहील असे रॉय प्रतिपादन करीत होते. आणी- बाणीचा काळ अनुभवल्यानंतर रॉय यांचे म्हणणे पटणे शक्य होते.

रॉय यांचा साम्यवादास विरोध म्हणजे मुक्त अर्थव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या भांड- वलशाहीचा पुरस्कार नव्हे हे जरूर लक्षात ठेवले पाहिजे.

रॉय यांचे मूळ मनुष्यस्वभावासंबंधीचे निष्कर्ष वादातीत नाहीत. सामान्य माणसाची विवेकशक्ती जागृत करावयास हवी यावर एकमत होऊ शकले तर त्यासंबंधीचा रॉय यांनी सुचविलेला मार्ग एकमेव आहे असे नाही. या दोनही विषयांची अधिक चिकित्सा व्हावयास हवी. त्याखेरीज रॉय यांच्या विचारांना पूर्णत्व प्राप्त होणार नाही.

## व्यवस्था आणि व्यक्ती

आजची भारतातील राजकीय परिस्थिती रॉय यांच्या विचारांची आठवण करून देणारी आहे. त्यांच्या विचारांचा धागा पकडून आपणास प्रगती करावयास हवी. केवळ प्रबोधनावर भागेल काय ? हा प्रश्न साहजिकच उभा राहतो. राजकीय पक्ष व राजकीय नेते यांच्यावर विश्वास ठेवण्या- सारखी परिस्थिती नाही. सर्वच स्वतःस समाजवादी म्हणवितात, कोणावर विश्वास ठेवावयाचा ? या परिस्थितीत प्रबोधनाचा

आशय स्पष्ट करणे आणि सामान्यांच्या संघटनांचा राजकारण्यांवर दबाव येईल, असे प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. कोणते वाद निरर्थक आहेत, कोणत्या योजना फसव्या आहेत हे स्पष्ट करून सांगावयास हवे. त्याचप्रमाणे आहे या परिस्थितीत स्वतःचे हात धुऊन घेण्याच्या प्रवृत्तीवरही आघात करावयास हवा. सामान्य माणसापासून सुरुवात करावी हे म्हणणे ठीक; परंतु संपूर्ण व्यवस्थेवर आघात करण्याचे मार्गही शोधावे लागतील. या संदर्भात म. गांधी व पं. नेहरू यांच्यातील एका संवादाची आठवण होते. परिवर्तनाच्या कार्यास व्यक्तीच्या प्रबोधनापासून–सुधारणेपासून सुरुवात करावी, की व्यवस्थेवर आघात करून 'माणूस' बदलण्याकडे जावे अशा स्वरूपाचा हा वाद होता. रॉय याबाबतीत म. गांधींचेजवळ जातात आणि व्यक्तीच्या प्रबोधनापासून सुरुवात करावी असे प्रतिपादन करतात. हाही एकप्रकारचा भाबडेपणा ठरू शकेल. व्यवस्थेवर आघात करण्याचे मार्ग शोधणे हेही तितकेच आवश्यक आहे. परंतु हा विषय निराळा.

श्री. कर्णिक यांनी रॉय यांच्या मानवतावादाची चिकित्सा केलेली नाही. काही प्रमाणात त्यांनी भक्तिभावाने रॉय यांचे चरित्र लिहिले आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्याचाही इरादा चिकित्सक ग्रंथ लिहिण्याचा नसावा. त्यामुळे त्यांच्यावर अशा तऱ्हेची टीका करणे योग्य ठरणार नाही. रॉय यांचे राजकीय चरित्र लिहून श्री. कर्णिक यांनी रॉय यांचे विचार परिपूर्ण करण्याची संधी आपणास दिली आहे. आजचा काळही त्यास अनुकूल आहे. म्हणून या ग्रंथाचे स्वागत करावे तेवढे थोडेच ! *

M. N. Roy : Political Biography
By –V. B. Karnik
Nav Jagriti Samaj, Bombay
Jan 1978, pp. 656
Price Rs. 124.

'फिनिक्स' निवड

## Among The Elephants

Jain & Oria Douglas-Hamilton
(Fontanna Books, Pages 320
Rs. 27–00)

हत्तीवरचे एखादे पुस्तक पाहिले की जंबो आईस्क्रीम, जंबो जेट, पॅचीडर्म, Biggest living land animal वगैरे शब्द आठवतात. लहानपणी टारझनचे सिनेमेही पाहिलेले आठवतात. लहान मुलांचे हत्तीबद्दलचे असीम कुतूहल, पेशवे पार्कमधील सुमित्रेच्या भल्या मोठ्या सोंडेत २५ पैशासारखे छोटे नाणे राहते तरी कसे असे मुलांचे प्रश्न आठवतात. आमच्या ग्रंथालयात केवळ हत्तीविषयी आणखीन एक पुस्तक आहे, त्याचे नाव 'Elephant Kingdom' असे आहे. या पुस्तकात मी एक मजेदार कात्रण लावले आहे. २० जुलै १९७५ च्या 'टाइम्स' मधील हे कात्रण आहे. त्याचे शीर्षक आहे 'Lewd Elephants strip Girl !' त्यात असे लिहिले, की तीस हत्तींच्या टोळक्याने एका मुलीभोवती गराडा घातला. त्यातील एका हत्तीने त्या मुलीचे सर्व कपडेच काढून पळवले ! जंबो रोड साईड रोमिओ झाल्याचे कदाचित हे एकमेव उदाहरण असेल.

माणसाचा मृत्यू हे एक गूढच आहे पण हत्तीचा मृत्यू हा एक विदारक अनुभव आहे. मृत्यू म्हणजे सारे काही संपले या भावनेमुळे बहुतेक लोकांना त्याची भीती वाटते पण एकदा एक wag (याला थट्टेबाज माणूस म्हणावे का ?) म्हणाला होता, "मला मृत्यूची भीती का वाटते माहीत आहे का ? Because my enemies and critics will have the last laugh !'

एखादा हत्ती आजारी पडला किंवा जखमी झाला की त्याच्याभोवती इतर हत्ती गराडा घालतात व त्याला सोंडेने उभा करण्याचा प्रयत्न करतात. एकदा एका तरुण हत्तीणीची शिकार करण्यात आली. ती मेल्यानंतर सतत तीन दिवस दुसरे हत्ती तिथून हलले नाहीत ! आणखीन एका हत्तीणीने तर आपल्या मेलेले पिल्लू कित्येक दिवस तिच्या हातावर ठेवले होते. हे असे करताना हत्ती मेलेल्या जीवाच्या दुर्गंधीचीही पर्वा करीत नाही. समस्त प्राणी जगात याशिवाय फक्त बबून असे करीत असतात.

मृत्यू जवळ आला की हत्ती आपणहून थडग्याकडे जातो असा एक समज किंवा अशी एक आख्यायिका आहे. डग्लस हॅमिल्टनच्या म्हणण्यानुसार हे सत्य नाही. कारण त्यांना जंगलात मेलेले हत्ती अमक्या एका जागेत न आढळता इतस्ततः विखुरलेले आढळले.

काही जिवंत हत्ती मेलेल्या हत्तीचे हस्तीदंत काढून घेतात ! (त्यांनासुद्धा त्याचे मूल्य कळते की काय ?) एका हस्तींदंताचे वजन १०० पौंडापेक्षा जास्त असू शकते. एका हत्तीच्या मृत्यूनंतर इतर हत्ती कसे वागतात यावरून उघड होते, की मनुष्यजात वगळता हत्ती हा मृत्यूविषयी जास्त विचार करतो. काही काही हत्ती मेलेल्या हत्तीपासून काढलेले हस्तीदंत जोरजोराने आपटून त्याचे तुकडे करण्याचा प्रयत्न करतात.

दात म्हणजे एक प्रकारची हाडेच. म्हणून डग्लस हॅमिल्टनने एक प्रयोग केला. एका मेलेल्या हत्तीची हाडे त्याने एका नदी किनाऱ्याजवळ आणून ठेवली. तिथे पाणी पिण्यासाठी वेगवेगळे हत्तींचे ८ कळप आले. त्यातील सहा कळपांनी हाडाभोवती गराडा घातला. हे सहा कळप हाडे बघून बिथरले. पायांनी हाडे मागे पुढे फिरवून ती तपासली. पुष्कळ वेळा मेलेल्या हत्तीची हाडे पोस्टमार्टेमसारखी इतर हत्तींकडून तपासली जातात. काही वेळा काही हत्ती मेलेल्या हत्तींची हाडे जणू काही भानामतीसारख्या प्रयोगासाठी घेऊन जातात.

एकदा एका हत्तीला गोळी घालून ठार मारण्यात आलं. त्याचं शक्य तेवढं मांस काढून जंगलातील लोकांना खायला दिलं व त्या हत्तीचं मढं अर्धा–एक मैल लांब टाकलं. त्या रात्री इतर हत्ती त्या मढ्याजवळ आले व त्यातील एकाने एक हाड उचलून नेमके जिथे त्या हत्तीला गोळी घालण्यात आली होती तेथे टाकले !

या पुस्तकात असेसुद्धा लिहिले आहे, की क्वचित हत्ती दुसऱ्याची दफनक्रिया करतात. काही हत्तींनी एकदा एका बाईला जिवंत गाडून टाकली होती. बंदुकीच्या गोळ्यांनी जखमी झालेला वाघ नरभक्षक बनतो, तर हत्ती अत्यंत चिडखोर बनतो. अशा रागाच्या भरात एका हत्तीने काही माणसांना मारून वर माती व वनस्पती टाकून गाडून टाकल्याची उदाहरणे आहेत. इतर जीवांची हत्ती दफनक्रिया करतात हें मला माहीत नव्हते. असे मात्र वाचले होते की एखादा हत्ती मेला तर इतर हत्ती त्याला जमिनीत गाडून टाकतात.

मेलेल्या हत्तीत इतर हत्ती इतका रस का घेतात याबाबतीस डग्लस हॅमिल्टननी एक तर्क बांधला आहे, त्यांना वाटते की, मृत हत्तीचा वास घेऊन जिवंत हत्तींना असे कळते, की मृत्यू का व कसा झाला असावा. परंतु नुसत्या गंधावरून जर एवढे कळत असते तर नेमक्या कोणत्या शिकाऱ्याने हत्तीला गोळी घातली हेही समजले असते ! काहीही असो पण मृत्यूमध्ये हत्तीला वाजवीपेक्षा जास्त रस आहे एवढे निश्चित !

हत्ती कोणत्या कारणांवरून मरतात याचे विवेचन हॅमिल्टनने ' Death ' या प्रकरणात केले आहे. हत्तीच्या आडदांड देहावरून आपल्याला वाटत असते, ' अरे याला काय होणार ?' पण या गजाला इतके रोग होत असतात की, हा प्रचंड प्राणी इतका नाजूक कसा असा प्रश्न आपल्याला पडतो. मोठ-मोठ्या झाडांना हत्ती आपले हस्तिदंत आपटून त्यांना खिळखिळे करीत असतो. बऱ्याच वेळा अशी खिळखिळी झाडे अंगावर पडून ते मरतात. खड्ड्यात पाय पडून मोडणे वगैरे अनेक अपघात हत्तीला होत असतात. हे गजराज जेवढे disease prone असतात तेवढेच accident prone असतात. काही हत्ती या रोगराईतून व अपघातातून बचावतात व म्हातारे होतात. म्हाताऱ्या हत्तीचे दात इतके झिजतात, की त्याला आवश्यक तो आहार घेऊ शकत नाही. एकमेकात भांडण करून हत्ती मेल्याची उदाहरणे अगदीच कमी आहेत. आफ्रिकेत हत्तीच्या पिल्लांना मात्र सिंहाकडून बराच धोका असतो. काही हत्तींना टेनीस बॉलएवढे गळू होतात. (पेशवे पार्कमधील सुमित्रा विचारी!) पण हे गळू आपोआप नाहीसे होते असे डग्लस हॅमिल्टन म्हणतात. सुमित्रेचं गळू मात्र वर्षानुवर्ष तसंच आहे. तिला बहुतेक पेशवेपार्कोसिस झाला असावा ! पेशवेपार्कोसिस या रोगाने आतापर्यंत कितीतरी बळी घेतले आहेत. परवा मी फीडींग... टाईमच्या वेळेला पेशवेपार्कमध्ये गेलो असता थक्क झालो. तेथील एका मोठ्या सिंहाच्या पिंजऱ्यात कर्मचाऱ्याने मांसाचे मोठे एकदोन लचके टाकले. लगेच किती तरी कावळ्यांनी त्या लचक्यातील तुकडे पळवले. काही कावळे तर अक्षरशः सिंहाच्या आतील पिंजऱ्यात घुसले. कावळ्याने मांसाचा सिंहाचा वाटा जरी पळवला नसला तरी कमीत कमी या सिंहाचा २५ ते ३० टक्के एवढा माल जरूर पळवला असेल. अशा प्रकारे जर थोड्या दिवसांनी सिंहाला (त्याचे नाव प्रताप असावे) पेशवेपार्कोसीस झाला तर नवल ते काय ?

हस्तिदंतासाठी पोचर्स गजाची हत्या करतात हे सर्वांना माहीत आहेच. हत्ती मरण्याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे माणूस. आफ्रिकेतील वांबुलू ही जमात भाल्याने हत्तीची शिकार करते. भाला हत्तीच्या गळ्यात शिरला की त्यांना मोठी मौज वाटते.

डग्लस हॅमिल्टन यांनी ५ वर्षे लेक मन्यारा नॅशनल पार्क, टांझानिया येथे गजाच्या सवयीचा व इतर अभ्यास केला. त्यांनी ज्या हत्तींचा अभ्यास केला ते माणसाळलेले नव्हते. गुडाल बाईने चिंपांझीवर जसे सखोल संशोधन केले तसेच डग्लस हॅमिल्टनने गजाविषयी केले आहे. वन्य प्राण्यांच्या चाहत्यांना या पुस्तकाची नेहमी आठवण राहील. हॅमिल्टनच्या पत्नीने घेतलेली छायाचित्रेही सुंदर आहेत.

**–जे. एन. पोंडा**

---

# तितिक्षा :

## एक सामाजिक व शैक्षणिक नियतकालिक

---

'तितिक्षा' या अपंगांच्या विकासाला वाहिलेल्या एकमेव मराठी त्रैमासिकाने आपल्या कारकीर्दीची दोन वर्षे नुकतीच पुरी केली. ध्येयवादाचे वेड असलेल्या महाराष्ट्रातील 'तितिक्षा' हाही एक ध्येयवादी प्रकल्प आहे. समाजाचे अपंगत्व आणि अपंग व्यक्ती याबद्दलचे अंधश्रद्धामूल दृष्टिकोन नाहीसे करणे आणि अपंग व्यक्तीदेखील राष्ट्राची कार्यक्षम नागरिक आहे याची अपंगांना व समाजाला जाणीव करून देणे हे साधे पण सामाजिक उपयोगितेचे, म्हणून महत्त्वाचे धोरण तितिक्षाने बाळगलेले आहे.

'तितिक्षा'त अपंगत्वाविषयी शास्त्रीय व माहितीपर लेख, कार्यक्षम व जिद्दी अपंग व्यक्तींचा परिचय करून देणारे लेख, अपंगांकरिता काही चांगले कार्य करणाऱ्या संस्थांचा परिचय करून देणारे लेख, शासन व अन्य संस्थांच्यावतीने अपंगांना मिळणाऱ्या मदतीची माहिती देणारे लेख, यांसारखे उपयुक्त लेख तर असतातच; त्याचबरोबर स्वतः अपंग व्यक्तींनी लिहिलेले माहितीपर व ललित लेखही असतात. गेल्यावर्षी 'तितिक्षा'ने केवळ अपंग व्यक्तींनी लिहिलेले ललित व माहितीपर लेख समाविष्ट असलेला आगळा व वैशिष्टयपूर्ण दिवाळी अंक सादर केला होता. या अंकाच्या मुखपृष्ठ–मलपृष्ठावरील चित्रे एका कर्णबधिर मुलाने रेखाटलेली होती. यंदाही 'तितिक्षा'चा असाच दिवाळी–अंक प्रसिद्ध होणार आहे.

'तितिक्षा'सारखे सामाजिक नियतकालिक चालविणे हे खरोखर अवघड कार्य आहे. तथापि हे अवघड कार्य हाती घेतले आहे ते कोणत्याही सामाजिक वा अन्य संस्थेने नव्हे तर एका गृहिणीने. सौ. शकुंतला पुंडे ह्या 'तितिक्षा'च्या संपादिका आहेत. त्या स्वतः आणि त्यांच्याप्रमाणेच 'तितिक्षा'चा लेखकवर्गही कोणत्याही प्रकारचे मानधन घेत नाही. अंकाची सजावट, मांडणी, प्रुफ–रीडिंग, अंकांची वेष्टने चिकटविणे व त्यावर वर्गणीदारांचे पत्ते लिहिणे इत्यादी सर्व कामे स्वतः संपादिका पुंडे करतात आणि 'तितिक्षा' जास्तीत जास्त काटकसरीने चालवितात.

कर्णबधिर, अंध, विकलांग आणि मतिमंद अशा चार प्रकारच्या अपंगांबद्दल 'तितिक्षा'त शास्त्रशुद्ध माहिती दिली जात असल्याने महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणखात्याने 'तितिक्षा' ह्या त्रैमासिकाचे सर्व शैक्षणिक संस्थांनी वर्गणीदार व्हावे म्हणून शिफारस केलेली आहे. तात्पर्य, आपल्या 'स्व–रूपा'मुळे 'तितिक्षा'ला राजमान्यताही मिळालेली आहे.

सामान्यतः अपंगत्वाविषयीची माहिती इंग्रजी पुस्तकनियतकालिकातून असते. (मराठीत याविषयी अत्यल्प साहित्य आहे.) शिवाय ही माहिती तिकडील देशपरिस्थितीला धरून असते. तिचा भारतासारख्या विकसनशील देशातील परिस्थिती लक्षात घेता फारसा उपयोगही होत नाही. भारतातील अपंगत्व हे प्रामुख्याने दारिद्र्य व अंधश्रद्धा यातून उद्भवलेली समस्या आहे. त्यामुळे भारतीय भाषांतून अपंगविषयक माहिती देणारे नियतकालिक निघणे आवश्यक ठरते. 'मराठी'पुरती ही गरज 'तितिक्षा'ने भागविली आहे. ☐

## दलित संमेलन : पृष्ठ दोन वरून : दोन उत्कृष्ट कविता

'संस्कृताप्रमाणेच मराठी साहित्यही मध्यम वर्गाच्या चक्रात सापडलं आणि त्यामुळे दलित साहित्यिकांची पहिली पिढी गारद झाली. हल्लीचे मराठी साहित्यिक भंपक आहेत. मानसशास्त्राचा अजिबात अभ्यास नसताना हे मनोविश्लेषणात्मक कथा लिहितात. खऱ्या माणसाचा विचारच इथे कधी केला नाही. श्रीमती दुर्गाबाई भागवतांनी 'मुक्ता' या त्यांच्या पुस्तकात स्वातंत्र्याबद्दल लिहिले आहे. पण त्यांच्या या स्वातंत्र्याच्या कल्पना अतिशय मर्यादित आहेत. सामान्य माणसाच्या स्वातंत्र्याची, सुरक्षिततेची त्यांना चिंता नाही. कारण दुर्गाबाईंच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेमध्ये सम्यकतेचा अभाव आहे. आमच्या सगळ्याच विचारवंतांची स्वातंत्र्याची कल्पना आप्पलपोटी आहे.

'या देशात संपूर्ण राजकीय क्रांती झाली पाहिजे. पण त्याही आधी इथे सामाजिक व संस्कृतिक क्रांती झाली पाहिजे. या दोन प्रकारच्या क्रांत्यांची पार्श्वभूमी असल्याशिवाय राजकीय क्रांती यशस्वी होऊच शकणार नाही. आजचे दलित साहित्य हे उद्या होऊ घातलेल्या सांस्कृतिक चळवळीची नांदी आहे. कारण गतिमान जीवनाचे निदान करतं तेच खरं साहित्य असतं. दलित साहित्यामध्ये हा गुण आहे. आणि म्हणूनच नव्या तरुणाचं नेतृत्व दलित साहित्यिकच उत्कृष्टपणे करू शकतील.

एव्हाना रात्रीचे साडेआठ वाजून गेले होते. आजचा कार्यक्रम संपला होता. उद्या सकाळी पुन्हा कविसंमेलन होणार होतं. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये 'केसरी' तर्फे भरविण्यात आलेल्या दलित कवी संमेलनाच्या स्मृती आठवतच जो तो घरी परतत होता.

◻

दुसऱ्या दिवशी सकाळी कविसंमेलनाचा कार्यक्रम झाला. परिषदेतल्या इतर सर्व कार्यक्रमांप्रमाणेच हा कार्यक्रम तास सव्वा तास उशीरा सुरू झाला! जाहीर झालेल्या कवींच्या नामावळीतील अनेक नामवंतांची अनुपस्थिती चांगलीच जाणवत होती. त्याचा परिणाम कार्यक्रमाच्या दर्जावरही झाल्याशिवाय राहिला नाही!

बुद्धवंदनेनंतर कविसंमेलनाला सुरुवात झाली. (विद्रोही, पुरोगामी, विज्ञाननिष्ठ अशा कवींचे संमेलन 'बुद्धं/धम्मं/संघं शरणं गच्छामि'—अशा 'धम्मं' पदाने सुरू का व्हावे हा एक प्रश्नच आहे!) अर्जुन डांगळे यांनी संमेलनाचे संयोजन केले. सुरुवातीला दलित कवितेबद्दल ते म्हणाले, 'साहित्याच्या स्थित्यंतरांच्या पाऊलखुणा प्रथम कवितेत उमटतात. दलित साहित्यातही मोठ्या प्रमाणावर कविता लिहिली गेली. क्रांतीचा झेंडा घेऊन ही कविता पुढे चालली आहे. मराठी कवितेतल्या साचलेपणाला हादरा देऊन तिचा चेहरामोहरा साफ बदलून टाकण्याचे काम तिने केलेले आहे.'

या संमेलनात सुमारे पंचवीस कवींनी भाग घेतला. सुन्न करून टाकणाऱ्या दाहक अनुभवातून दलित कविता फुललेली असल्याने ती सच्ची, रोखठोक आणि टवटवीत वाटते. याचा प्रत्यय याही कविसंमेलनातल्या काही कवितांनी आणून दिला. पण त्याच्या जोडीने आणखी एक गोष्ट मात्र जाणवली. ती म्हणजे या कवितेत एकसुरीपणा येऊ लागलाय. मध्यमवर्गीय साहित्यापासून वेगळे निघून वेगळ्या वाटेने चालणारे दलित साहित्यिकही मध्यमवर्गीय साहित्याप्रमाणे चाकोरीत अडकू लागलेले दिसतात. अनुकरणशीलता, कृत्रिमता ही त्यांच्याही कवितेत जाणवू लागते आणि जेव्हा असे होते तेव्हा विद्रोही कवीचे संमेलनही कधी कधी कंटाळवाणे होते. याचा प्रत्यय या कविसंमेलनात थोडाबहुत आलाच. अर्थात काही कवींनी मात्र आपल्या प्रतिभेचा सुंदर आविष्कार घडवला. सर्वच चांगल्या कवितांचा उल्लेख करणे अशक्य आहे. पण राम रांजणे, प्रमोद कोपर्डे, दत्ता वाघमारे, घनश्याम धेंडे, रमेश राक्षे, चंद्रकांत माघाळे, अर्जुन डांगळे वगैरेंच्या कविता विशेष उल्लेखनीय वाटल्या. ज्ञानराज गायकवाड आणि विजयकुमार चौकसे यांनी हिंदी कविता सादर केल्या आणि सुदैवाने त्या चांगल्या होत्या. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाचे पडसाद काही कवींच्या कवितांत प्रभावीपणे उमटून गेले. तरुण विद्रोही कवींमध्येही जरा जुन्या पिढीतलेच एक कवी विशेष चमकून गेले. ते म्हणजे शाहीर जगन्नाथ नांगरे. विनोदी शैलीतल्या त्यांच्या कविता विशेष दाद घेऊन गेल्या. 'मडक्याची कहाणी' आणि 'गाढवाची गाथा' या आपल्या कवितांतून माणसाच्या दुःखाच्याही पलीकडे जाऊन त्यांनी मोठ्या मिष्किलपणे एक वस्तू आणि एक प्राणी यांची व्यथा मांडली आणि त्या व्यथेतून माणसावरही प्रकाश टाकला. या संमेलनातले काही कवींचे कवितागायन सदोष काव्यरचना आणि सुमार गायन यामुळे कंटाळवाणे ठरले. अपवाद अर्थातच शाहीर नांगऱ्यांचा आणि विशेषत: दया पवारांचा. 'माझा कोंबडा कुणी मारिला बाई', 'पाणी कुठवर आलं ग बाई', 'बाई मी धरण बांधते ग' या मुळातल्या अप्रतिम कविता ते गायलेही सुरेख. दया पवार कविता गातात तेव्हा ती कविता कानात शिरून थेट हृदयाला भिडते.

या संमेलनातल्या दोन उत्कृष्ट कवितांचा उल्लेख करायलाच हवा. पाटीलबुवा आंधळे यांच्या 'मार्क्स' या कवितेतील या काही ओळी (त्यांवर वेगळे काही लिहायची गरजच नाही)—

'आज मार्क्सच्या नावाने फुगे फुगवून
जे असंख्य प्राध्यापक झाले

प्राध्यापकांचे डॉक्टर झाले
आणि
मार्क्सच्या नावावर बंगले बांधले
मार्क्सच्याच नावावर सोफासेट घेतले
अल्सेशियन कुत्री पाळली...
मित्रांनो,
आज मार्क्सचेच जे शोषण चालले आहे
ते थांबवलेच पाहिजे
आणि
मार्क्सच्या नावावर जगणाऱ्यांच्या हातात
कुदळ-फावडे दिलेच पाहिजे... '

सौ. हिरा बनसोडे यांची 'यशोधरा' ही अशीच एक अप्रतिम कविता. अनेक पतिव्रतांची दुःखे साहित्यात मांडली जातात. पण या बाबतीत दुर्लक्षिल्या गेलेल्या यशोधरेला कवयित्री म्हणते—

'पती नि पुत्र हरविलेली तू
उन्मळली होतीस केळीसारखी
पण इतिहासाने सांगितली नाही
तुझ्या त्यागाची महान कथा
सिद्धार्थाने समाधीचे ढोंग रचले असते
तर महाकाव्ये चितारली असती तुझ्यावर
गाजली असतीस सीता–सावित्रीसारखी
तूही पोथ्या-पुराणातून
यशोधरे,
धिक्कार वाटतो या अन्यायाचा
एकाही बुद्धविहारात तू नाहीस ?
पण थांब...अशी व्यथित होऊ नकोस
तुझं लोभस रूपडं मी बघितलंय
सिद्धार्थाच्या दोन्ही बंद पापण्यात

**तूच आहेस...येशू...तूच आहेस...**


सकाळी या कविसंमेलनाच्या रूपाने दलित साहित्याचा आविष्कार प्रकट झाला, तर संध्याकाळी या साहित्याच्या सामर्थ्यावर विचार-मंथन झाले. या परिसंवादाचे अध्यक्ष होते प्रा. गं. बा. सरदार. परिसंवादाचा विषय होता 'दलित साहित्य मराठी साहित्याला नवी दिशा, नवे सामर्थ्य देईल काय ?' परिसंवादाला प्रत्यक्ष आरंभ करण्यापूर्वी सभेने एक ठराव स्वीकृत केला. मराठवाडा आंदोलनाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नाव द्यावे, या स्वरूपाचा हा ठराव होता. या मागणीच्या पूर्ततेसाठी होणाऱ्या सत्याग्रहाला ठरावान्वये हार्दिक पाठिंबाही व्यक्त करण्यात आला.

परिसंवादात प्रथम बोलले प्रा. अविनाश डोळस. प्रस्थापित साहित्य आणि दलित साहित्य यांची चर्चा करताना ते म्हणाले, 'आपल्या आदर्शाच्या कल्पना अतिशय तोकड्या आहेत आणि साहित्य खुजं आहे. जो आमचा आदर्श मानला जातो त्या रामाने सतत तडजोडीचे राजकारण केले. धोब्याने शंका घेतली म्हणून बायकोला गरोदर अवस्थेत हाकलून देणाऱ्या या आदर्श पतीचे वर्णन साहित्यात केले जाते ! अन्यायालाच ग्लोरिफाय केले जाते. अशा खुज्या आदर्शामुळे साहित्यही खुजं आहे. जातीचे कवच फोडून लेखक पुढे जात नाहीत. जे खऱ्या अर्थाने जगतच नाहीत, ते खऱ्या अर्थाने साहित्य निर्माण करत नाहीत.

'दलित साहित्यिक मात्र तत्त्वासाठी विद्रोह करतात. ते देवधर्म जाणत नाहीत. ते माणूस मोठा मानतात. परंपरागत समीक्षेचे व लेखनाचे आदर्श ते नाकारतात. दलित साहित्याचा विद्रोह विधायक आहे. आपल्या साहित्याला दलित साहित्य हा एकच आशावाद आहे. साहित्याला खरी विश्वव्यापकता यायची असेल तर ती दलित साहित्यच देऊ शकेल.'

यानंतर दलित साहित्याचे एक समीक्षक डॉ. भालचंद्र फडके यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले—


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

'आज आपण अशा वेगळ्या जगात जगतोय की, जेथे माणूस सुरक्षित नाही. स्वस्थ नाही. त्याला भविष्यात काय करायचे याची कल्पना नाही. स्वातंत्र्य मिळून आज तीस वर्षे होऊनही प्रश्न वाढतच आहेत. 'उद्या जर बहुसंख्यांक अल्पसंख्यांकांना शोषितच राहिले तर असंतोषाचा इतका स्फोट होईल की त्यात सगळं राज्यच खलास होईल,' हे बाबासाहेब आंबेडकरांचे इशारतीचे बोलणे आज खरे वाटू लागते. येथे दोनच स्वातंत्र्ये आहेत. एक, दारिद्र्य गोंजारत राहण्याचे आणि दुसरे, दुःख भोगण्याचे. मराठी साहित्याचा शोध घेताना मात्र हे जाणवत नाही. माणसाच्या जगण्याशी त्याचा संबंध नाही. साहित्य निर्मिती करणाऱ्या मध्यमवर्गाने व्यापक असे चित्र दिलेच नाही.

'खऱ्या साहित्याला मृत्यू नसतो, जन्मच असतो. या कसोटीवर सध्याचे साहित्य निरर्थक वाटते. आपल्या जगण्याहून भिन्न वाटते. साहित्य आपल्याला हलवू शकते का नाही, ते जिवंत आहे का नाही 'जाणिवेची कळा' वाढवते का नाही यावर साहित्याचा दर्जा अवलंबून असतो. दलित साहित्य, साहित्य या कसोटीला उतरते. ज्याने हृदयाच्या तारा हलताहेत, ज्याला डोळे आहेत त्याचे डोळे उघडले जाताहेत, असा अनुभव या साहित्याने दिला. दलित साहित्याने नवी मूल्यव्यवस्था आणली, मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे त्यातील प्रधान मूल्य. माणूस केंद्रस्थानी आणि मोठा मानणारे हे साहित्य आहे.

दलित साहित्य कवितेच्या दृष्टीने समृद्ध आहे आणि अनेक नव्या दिशा त्याला मिळण्याची शक्यता आहे. नाटक, कादंबरी इ० प्रकार आपल्या दिशा शोधताहेत. हे साहित्य नव्या प्रवाहाला दिशा देईल. पण त्याने प्रस्थापित आदर्श, कसोट्या बाजूला सारून नवीन आदर्श निर्माण करायला हवेत. संघर्षाची भूमिका घेताना प्रथम नकार द्यावा लागतो. तो दलित साहित्याने दिलेला आहे. हा नकार नपुंसक आहे असा जो आरोप केला जातो तो खोटा आहे. दलित साहित्याच्या नकारालाही स्वीकार आहे आणि तो माणुसकीच्या संदर्भात आहे. भयाण वास्तवाचे भान आणून देण्यासाठी दलित साहित्यानेसुद्धा आपल्या सर्व कक्षा विस्तृत केल्या पाहिजेत. मराठी साहित्यातील मरगळ नष्ट करण्याचे कार्य दलित साहित्याशिवाय कोणाला करता येणार नाही अशी माझी खात्री आहे."

"कालच्या माझ्या भाषणात मी माझे बरेचसे म्हणणे मांडलेलेच आहे", असे सांगून प्रा. रावसाहेब कसबे यांनी त्यात आणखी थोडी भर घातली. ते म्हणाले,

"दलित साहित्याने मराठी साहित्याला जुन्या चक्रातून बाहेर काढलं. अनुभवाच्या क्षितिजांना अधिक विस्तारले. जीवनाच्या संबंधाने विविध दृष्टिकोणातून बघता येते हे सिद्ध केले. मराठी साहित्यात आत्मटीकेची भूमिका प्रथम दलित साहित्याने मांडली आणि हे लक्षात ठेवायला हवे की, आपण आत्मटीका करत नाही, तोवर आपली कुठलीही चळवळ पुढे जाणार नाही."

मराठी साहित्यात दलित साहित्य समाविष्ट होण्याच्या संदर्भात जयदेव गायकवाड यांनी चर्चा केली. ते म्हणाले, 'दलित साहित्याचा प्रवास छोटा असला तरी त्याने दिलेली दिशा व्यापक आहे. त्याची भूमिका, स्वप्न व्यापक आहे, निर्दोष आहे, जिवंत आहे. ते माणसाचे साहित्य आहे. विश्वसाहित्य आहे. म्हणूनच मराठी साहित्याच्या साचलेल्या डबक्यात ते समाविष्ट होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. दलित साहित्य हा उद्याच्या मराठी साहित्याचा मुख्य प्रवाह आहे.'

डॉ. ज्ञानराज गायकवाड यांच्या मते, 'साहित्य वगळले तर जीवन जीवन राहणार नाही. भाव आणि विचार दोन्ही महत्त्वाचे आहेत. ते व्यक्त करणारे साहित्यच महत्त्वाचे असते. दलित-साहित्याच्या रूपाने मराठी साहित्य, रसिक टीकाकार हे विचार-मंथनाकडे प्रवर्तित होत आहेत. दलित साहित्य मराठी साहित्याला नवी दिशा देणारे आहे.'

## सरदारांचा समारोप

परिसंवादाचा समारोप प्रा. गं. बा. सरदार यांनी केला. प्रा. सरदार हे एकीकडे संतवाङ्मयाचे अभ्यासक आहेत, तर दुसरीकडे क्रांतिकारी, पुरोगामी विचारांचेही तितकेच अभ्यासक, एवढेच नव्हे तर पुरस्कर्तेही आहेत. यामुळेच की काय, पुरोगामी आणि परखड विचार मांडतानाही ते संताच्या ऋजुतेनेच मांडतात. त्यांचा भावनेपेक्षा विचारांवरच भर असतो; पण या विचारांनाही सात्विकतेची बैठक असते. ते आपल्या भाषणात म्हणाले—

'दलित साहित्य मराठी साहित्याला नवी दिशा देऊ शकेल. दिशा दिलेली आहे असे नव्हे; पण ती देण्याचे सामर्थ्य या साहित्याच्या ठिकाणी आहे.

'परंपरेने ज्यांना काहीच दिले नाही, ज्यांच्यावर अन्याय केला, तेच लोक या परंपरेवर हल्ला करू शकतील. दलित साहित्यात विद्रोह आहे तो यामुळेच. पण या समाजाचा पायाच खणायचा असेल तर त्याचा रोग आधी शोधला पाहिजे. अनेक मोठी माणसे या देशात झाली. पण हा रोग नष्ट झाला नाही. कारण हा प्रश्न नुसता व्यक्तींचा नाही. त्यांच्या सद्‌हेतू वा लबाडीचा नाही. मानवजातीची वाटचाल विषमतेकडून समतेकडे चाललेली आहे. त्यादृष्टीने विविध प्रयत्न झाले. पण हा प्रश्न का सुटला नाही? वाङ्मय अपुरं का पडलं?... जुन्या अपयशाची कारणे शोधली पाहिजेत. नुसत्या भावनेने भागत नाही! प्रक्षोभ हवा, भावना हवी, पण पद्धतशीर संघटित प्रयत्नही करावे लागतात. दलित साहित्यातली सुप्तशक्ती वाया जाता कामा नये असे मानणारा मी आहे. पण नुसत्या आशावादाने भागत नाही. कोणत्या पद्धतीने प्रयत्न करायला हवेत हेही सांगण्याची आवश्यकता आहे. नुसत्या आत्मविश्वासाने भागणार नाही. मार्गाचाही विचार हवा.

'दलितबांधवांना माझे सांगणे आहे की, तुम्हाला आणखी अभ्यास करायला हवा. क्रांती करायची असेल तर जागतिक इतिहासाचा सम्यक् अभ्यास केला पाहिजे. ज्याला खणून काढायचे त्याची पाळेमुळेही माहिती पाहिजेत. या देशात क्रांती व्हायची असेल तर सर्व शोषित वर्ग एक होऊन एका दिशेने कार्यमग्न झाल्याशिवाय ती होणार नाही. आज वरपासून खालपर्यंत सर्व पातळ्यांवर गोंधळ आहे. संभ्रमाची स्थिती आहे. ती कुठून आली याचा विचार करायला हवा. सामर्थ्ये शोधली पाहिजेत. ती पोकळीतून येत नाहीत. वास्तवातून येतात. सामर्थ्याचे झरे. या भूमीतच आहेत. पुन्हा वैफल्य यायला नको असेल तर ही क्रांती कुणाविरुद्ध आहे हे ओळखायला हवे. आपल्या शक्तीच्या मर्यादा आणि वास्तवाचे भान ठेवूनच पुढे जायला हवे.

'अनुभवातला नवेपणा साहित्याला जन्म देतो. दलितांचा अनुभव वेगळा आहे. त्यात मौलिकता आहे. खोलपणा आहे. पण त्यातून कोणती भर पडणार याचा विचार हवा. अनुभवाचे नुसते छायाचित्रण उपयोगाचे नाही. त्याला वैचारिक आणि कलात्मक पातळीवर नेण्यासाठी साधना हवी. ती टळत नाही.


'दलित साहित्याला खरोखर असे बळ आहे की, ते मराठी साहित्याचा कायापालट घडवेल. मग ते दलित साहित्य म्हणून राहणार नाही, तर क्रांतिसाहित्य बनेल. दलितपण नष्ट करण्यासाठीच तर हे सगळे आहे. पण हा झगडा नुसता दलितमुक्तीचा नाही, मानवमुक्तीचा आहे. आमची चाड अन्यायाची आहे, केवळ एका जातीवरच्या अन्यायाची नाही. सगळा समाजच बदलायचा आहे!

'दलित साहित्याचे सगळे बळ ते चळवळीशी निगडित आहे म्हणून आहे. कुठल्याही दलित साहित्यिकाने चळवळीशी विघटित होऊन चालणार नाही. दलित साहित्य सर्वांगीण क्रांतीशी निगडीत आहे. या देशात ज्ञान आणि श्रम यांची फारकत झाली त्या दिवसापासून समाज संकुचित बनला. आमचे जीवनादर्श, मूल्ये तुंबून राहिली. ते बदलण्याचा प्रयत्न झाला नाही हे लक्षात घेऊन दलित साहित्यिकांनी चळवळीशी निगडीत राहिले पाहिजे. चळवळ आणि साहित्य हातात हात घालून चालतंय तोवरच त्याला भवितव्य आहे. चळवळीची नाळ तुटली तर त्याचे महत्त्व संपेल. तेही मध्यमवर्गीय होईल! आज इतरांबद्दल विचार करू नका. आपण आपली शुद्धता राखली पाहिजे. समर्थ प्रतिभा जोपासण्याचा प्रयत्न करायला हवा. दलित साहित्यिकांच्या निष्ठेची सत्वपरीक्षा आहे. दलित साहित्य आमचे आहे. म्हणूनच त्याच्याकडून अपेक्षा आहेत. अपेक्षा करणे सोपे असते, पण त्या पूर्ण करणे अवघड असते. त्या कसोटीलाही ते उतरावे अशी शेवटी मी अपेक्षा करतो.'

## दलित रंगभूमी

या परिसंवादानंतर रात्री टिळक स्मारक मंदिरात दलित रंगभूमीनिर्मित 'काळोखाच्या गर्भात' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. हे नाटक भि. शि. शिंदे यांनी लिहिले होते. दिग्दर्शक होते टेक्सास गायकवाड. दलित कवितेप्रमाणेच दलित रंगभूमीही जोमाने पुढे जाईल अशी आशा करायला नक्कीच हरकत नाही. □

दलित साहित्यिकांची ही परिषद दोन दिवस मोठ्या उत्साहाने पार पडली. या परिषदेसाठी राबणाऱ्या एका उत्साही कार्यकर्त्याचा उल्लेख करायलाच हवा. तो म्हणजे श्री. मुरलीधर जाधव यांचा. त्यांच्या सहकाऱ्यांचे सहकार्यही तितकेच मोलाचे होते. परिषदेने काय साधले याचा फार हिशेब मांडण्यात अर्थ नाही. कारण मग मराठी साहित्य-संमेलने तरी तसे फार काय साधतात? त्यांच्याइतके तरी निदान या परिषदेने नक्कीच साधले. मुख्य म्हणजे या परिषदेने काही प्रश्नांकडे लक्ष वेधले हेही काही कमी नाही. या प्रश्नांची सविस्तर चर्चा येथे शक्य नाही. पण त्यांचा निर्देश जरूर करायला हवा. एक प्रश्न असा की, मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर व्हावे का? ह्या नामांतराने काय साधेल? किंवा ते न झाल्याने काय साधेल? दुसरा प्रश्न असा की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर शतखंडित आणि निस्तेज झालेली चळवळ दलित साहित्यिक निस्वार्थीपणे आणि खंबीरपणे पुढे नेणार का? मुख्य म्हणजे दलित चळवळीची फुटीची शोकांतिका संपणार का? तिसरा प्रश्न असा की, मराठी साहित्य आणि दलित असे पूर्णपणे अलग आणि अलगच नव्हे तर परस्परविरोधी कप्पे पाडणे योग्य आहे का? त्यातही पुन्हा दलित साहित्यच फक्त पुरोगामी, विद्रोही, क्रांतिकारी, जिवंत आणि उरलेले सगळे मराठी साहित्य प्रतिगामी, हिणकस, मध्यमवर्गीय, मृतप्राय असे काही खरोखरच आहे का? या प्रश्नांचा विचार सर्वांनीच करायला हवा, त्या विचारातून काही तरी आचारही घडायला हवा, हे नक्की! □

लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# सरगम

## नावात काय आहे ?

माणसाला चरकात घालावं, नाही असं नाही; पण किती? खऱ्या चरकाला सुद्धा उसाचा रस शोषून घेण्याच्या क्षमतेच्या बाबतीत काही मर्यादा पडतात. उसाचें चिपाड झाल्यानंतर तो चरकसुद्धा विचारा हात टेकतो. पण दिग्दर्शक के. विश्वनाथ यांनी मात्र प्रेक्षकांचा चोथा करण्यावरच विश्रांती घेतली नाही, त्यांनी नंतर त्या चोथ्याचे मनःपूर्वक बारीक तुकडे केले आहेत. ते जाळले आहेत आणि मग ती राख वाऱ्यावर सोडून दिली आहे. त्यांचा 'सरगम' हा चित्रपट पाहिलात तर मला काय म्हणायचे आहे याचे तुम्हाला प्रत्यंतरच येईल.

नृत्यकलेत पारंगत पण मुकी हेमा (जयाप्रदा) आणि डफ वाजविणारा राजू (ऋषीकपूर) यांच्या भावुक, भाबड्या, हळव्या इत्यादि इत्यादि प्रेमाची ही कथा. हे प्रेम हळूहळू जुळत जाते आणि काही नाच, काही गाणी, एक खलनायक, थोडीशी मारामारी, थोडासा 'प्रेम की अमुकतमुक?' (त्या अमुकतमुकमध्ये व्यवहार, वचन इत्यादी बऱ्याच गोष्टी) असा तात्त्विक हलकाफुलका प्रश्न इत्यादि बऱ्याच गोष्टी होऊन शेवटी सुफळ संपूर्ण होते, अशी काही तरी 'सरगम'ची कथा आहे. ती अशी नसून वेगळ्या प्रकारची आहे. असा वाद घालायला कुणी माझ्याकडे येणार असेल तर आपली बिनशर्त शरणागती हे आधीच स्पष्ट करतो.

संपूर्ण चित्रपटात स्वप्नगीत आणि वास्तव या भोवऱ्यात तर मी स्थळकाळव्यक्ती यांचा संदर्भ लावायचा सोडून दिला होता. त्यामुळे दोन व्यक्ती एखाद्या भिंतीसमोर बसून बोलत असतांना एका वाक्याला दगडी असलेली भिंत क्षणात दुसऱ्या वाक्याला हिरवी होणे किंवा पाहता पाहता दुसऱ्या पावलाला एखाद्याच्या अनवाणी पायात बूट येणे वगैरे प्रकार मी निमूटपणे सहन केले. घडी घडी स्वर्ग, पृथ्वी, पाताळ असा प्रवास करणारी स्वप्नगीतेसुद्धा निमूटपणे पाहिली. चित्रपट सुरू झाल्यानंतर, साधारण पंधरा मिनिटांनंतर मिनिटाला पाच या दराने मला चित्रपट संपलाय, असं वाटायचं. अखेर असे वाटण्याची संख्या चार आकडी झाली, तेव्हा चित्रपट संपला.

या चित्रपटातून जयाप्रदा ही दाक्षिणात्य अभिनेत्री हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करते आहे. चांगल्यापैकी सुंदर, सोज्ज्वळ चेहरा, नृत्यकलेतील प्रतिष्ठा आणि चक्क अभिनयाचीही जाण यांमुळे जयाप्रदा बहुधा जम बसवील. ऋषीकपूर मात्र सहजतेने, सफाईने काम करण्याच्या धडपडीत आणि ओढाताणीत नको नको इतके पिळतो. बाकी कलाकारांपैकी फक्त केश्तो मुकर्जी आणि शशिकला उल्लेखनीय (ही उल्लेखनीयता अर्थातच सापेक्ष आहे.)

प्रत्यक्ष नायक–नायिकांच्या पदरी संगीत व नृत्य या कलांनी आश्रय घेतलाय म्हटल्यावर चित्रपटात या अंगांना महत्त्व असायला हवे. अशी एक भाबडी अपेक्षा मी बाळगली. त्यापैकी 'नृत्य' या प्रकारात ती थोडीफार पूर्ण झाली. राजू व हेमाच्या काही संरचना (composition), विशेषतः त्यांची टिपलेली काही स्तब्ध क्षणचित्रे फारच सुरेख आहेत. संगीत या प्रकाराने मात्र निराशाच केली असे नाही, तर चीड आणली. मुळात संगीताला चित्रपटात महत्त्वाचे स्थान आहे, असे वाटणारा कोणीही सुजाण, सुबुद्ध माणूस लक्ष्मीकांत–प्यारेलाल या संगीत राहू–केतूंच्या वाटेला आपणहून जाणार नाही. ही एकच घोडचूक चित्रपटाला शेवटपर्यंत भोवली, केवळ लताच्या आवाजामुळे 'परबत के उस पार', 'कोयल बोली' 'डफलीवाले, डफली बजा' ही तीन गीते श्रवणीय बनली आहेत. तोही फक्त लता म्हणते तेवढाच भाग, रफीच्या नरड्यातली मजा कुठे तरी हरवली आहे.

चित्रपटाची एकमेव जमेची बाजू म्हणजे के. के. महाजन यांचे सुंदर छायाचित्रण. आधी म्हटलेल्या संरचनांच्या सौंदर्यामध्ये त्यांचा वाटा फार मोठा.

'सरगम' या सांगीतिक नावावरून फक्त एकच आठवते,

शेक्सपियर म्हणतो, नावात काय आहे ? □

# चित्रपटाबाहेर....

हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये आजपर्यंत अनेक नटनट्या आल्या आणि गेल्या. कित्येकजण ताऱ्याप्रमाणे तळपता तळपता अचानक कुठे अदृश्य झाले हे कोणाला कळलंदेखील नाही. अर्थात त्याची पुढे कोणी दखलही घेतली नाही. पण या इंडस्ट्रीत काही तारे असेही आहेत की, जे एकदा चमकू लागल्यावर त्यांचे तेज कधी निमालंच नाही. त्यांच्या जीवनात तर त्यांनी नाव कमावलंच, पण मृत्यनंतरही दुनिया त्यांच्या गुणांचे गोडवे गात राहिली. असं स्थान मिळविणारे काहीजण आजही ही चंदेरी दुनिया गाजवत आहेत. संजीवकुमार हा अशांपैकीच एक. 'खिलौने'पासून 'मनोरंजन' आणि 'शोले'पर्यंत विविध प्रकारच्या आणि दर्जाच्या चित्रपटात या कलावंतानं कामं केली. पण त्याचा दर्जा मात्र कधीच घसरला नाही. अर्थात कोणत्याही ज्येष्ठ–श्रेष्ठ अभिनेत्याप्रमाणे संजीवकुमारचंही पूर्वायुष्य आत्मचरित्र लिहिण्यासारखं आहे. भरपूर उपेक्षा, हलाखीची स्थिती, प्रचंड धडपड आणि निराशेच्या खोल गर्तां यातून हा महान नटही सुटू शकला नाही. स्वतःच्या या आयुष्याबद्दल बोलताना संजीवकुमार म्हणतो–

'सात बहिणींनंतर माझा जन्म झाला. त्यामुळे साहजिकच माझे घरी खूप लाड केले जात. शाळेत जाण्याचा मला भयंकर तिटकारा. त्यामुळे रोज जेव्हा मी आमच्या गड्याच्या खांद्यावर बसून रडत-ओरडत शाळेला जात असे आणि पाठीमागून आई हातात छडी घेऊन चालत असे तेव्हा ते दृश्य पाहण्यालायक असे.

'वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच मला फिल्म इंडस्ट्रीबद्दल आकर्षण वाटायला लागलं. मला 'फिल्म स्टार' व्हायचं होतं. त्यामुळं बऱ्याच वेळा रणजित स्टुडिओ आणि श्री साऊंड स्टुडिओज या दोन स्टुडिओं-

भोवती मी तासन्तास रेंगाळत असे. आता कोणाचाही या गोष्टीवर विश्वास बसणार नाही, पण त्या काळात मी अतिशय काटकुळा होतो. त्यानंतर मी पोहोणं आणि क्रिकेट खेळणं सुरू केलं आणि माझी तब्येत जी सुधारायला लागली ती अजूनही थांबलेली नाही.

''आवारा' या चित्रपटातील भूमिकेबद्दल मला पहिलं पदक मिळालं ते मी अजूनही जपून ठेवलेलं आहे. मी राजकपूरचा फार चाहता असल्यामुळे हे पदक मिळाल्याचा मला जास्तच आनंद झाला. राजकपूर हे माझं प्रेरणास्थान आहे. म्हणूनच तो पारितोषिक वितरणाचा समारंभ मला माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण वाटतो.

'मॅट्रिकनंतर मी पुन्हा स्टुडिओभोवती घोटाळणं सुरू केलं. राजकपूरच्या 'श्री ४२० ' चं शूटिंग चालू होतं. मला त्या चित्रपटात काम मिळालं नाही, पण त्या ठिकाणी माझी आणि इंदिवरची भेट झाली आणि तो मला आय. पी. टी. ए. मध्ये घेऊन गेला. तिथेही मी वर्षभर काहीही न करता नुसतं पाहत राहिलो. त्यामुळे माझी कोणी दखलही घेतली नाही. नंतर मी 'प्रॉम्प्टर' चं काम सुरू केलं, पण माझा आवाज फारच 'सॉफ्ट' असल्याचे कारण सांगून मला त्यात नापास करण्यात आले.

'एकदा सत्येन कप्पूने लिहिलेलं एक 'स्क्रिप्ट' बसवलं जात होतं. ए. के. हनगल त्याचा दिग्दर्शक होता. त्यामध्ये एका पारशाची भूमिका करणाऱ्या नटाने शेवटच्या क्षणी दगा दिला. त्यामुळे हनगल नवीन कोणी तरी मुलगा शोधत होता. मी माझं सारं बळ एकवटून 'मला संधी द्याल का,' म्हणून विचारलं. हनगल म्हणाला, 'ही भूमिका विनोदी आहे. तुला जमण्यासारखी नाही.

'मी पुन्हा गप्प बसलो. आणखी तीन-चार जणांची चाचणी घेण्यात आली. शेवटी पुन्हा एकदा मी मला संधी देण्याची हनगलला विनंती केली. मला एक चान्स दिला गेला आणि सर्वांना जबरदस्त धक्का बसला. हनगलने मला पुन्हा करायला सांगितलं आणि प्रत्यक्ष 'शो'च्यानंतरही माझंच कौतुक सर्वात जास्त झालं.

'डमरू' हे मी काम केलेलं दुसरं नाटक. सध्याची प्रसिद्ध अभिनेत्री शबाना आझमी हिची आई शौकत आझमी त्या नाटकात माझ्या पत्नीची भूमिका करणार होती. सहा पोरांचा बाप म्हणून वयाच्या एकविसाव्या वर्षी काम करणं कठीणच होतं. 'ये लौंडा क्या करेगा ?' म्हणून शौकतने मला हिणवलंदेखील. पण या नाटकानंतर ती माझी फॅन बनली.

'हे सगळं जरी होतं तरी अजून फिल्म इंडस्ट्रीमध्ये माझे पाय रोवले जात नव्हते. राजश्री पिक्चर्सने एका सिनेमासाठी माझ्याशी कॉन्ट्रॅक्ट केलं होतं, पण नंतर मी जरी स्टेजकरता चांगला असलो तरी स्क्रीनकरता मी अयोग्य आहे, असं सांगून राजश्री पिक्चर्सने ते कॉन्ट्रॅक्ट मोडलं. १९६३ साली घडलेल्या या घटनेमुळे मी अतिशय खिन्न झालो, आणखीनच अंतर्मुख होऊन विचार करायला लागलो.

त्यानंतर मी फिल्मालय स्कूलमध्ये जाऊ लागलो पण वर्ष-दोन वर्ष मला एकही मित्र नव्हता. माझ्या टेंपरामेंटमध्ये पुष्कळच फरक पडायला लागला. मी थोडासा एकलकोंडाही बनलो. घरची आर्थिक परिस्थितीही हलाखीचीच होती. वडिलांचा पर्शियन गल्फमध्ये मालाची निर्यात करण्याचा व्यवसाय त्यांच्या मृत्यूनंतर बंद पडत आला होता. मी तोही पुन्हा चालू करायचा प्रयत्न केला. पण त्यात माझं लक्ष लागेना. त्याचवेळी आपण आपल्या कुटुंबाला आधार दिला पाहिजे असंही मला वाटायला लागलं. कारण घरात दोन भाऊ, एक बहीण आणि आई असा परिवार होता आणि महिन्याला जेमतेम दोनशे रुपये घरात येत असत. त्या व्यतिरिक्त जे काही पैसे लागतील ते माझी आई नातेवाईकांकडून उधार–उसनवारीने आणत असे. कित्येक वेळा या पैशासाठी माझे काका आमच्या घरी येऊन आवाज चढवून आईशी भांडत, आई आणखी थोडी मुदत वाढवून देण्याची याचना करत असे, मी अतिशय कष्टी होई.

'मी बऱ्यापैकी पैसे मिळवायला लागल्यानंतरही कित्येक दिवस रेल्वे आणि टॅक्सीने प्रवास करत होतो. बऱ्याच जणांनी मला स्वतःची गाडी घेण्याचा आग्रह केला पण कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यायचं ते माझ्या मनात निश्चितपणे ठरलेलं होतं. आम्हा भावंडांना वाढविण्यासाठी आईने जे कर्ज वेळोवेळी काढलं होतं ते फेडण्यातच माझी बरीच वर्षे गेली. शेवटी १९६८ साली नंदाबरोबरच्या 'पति–पत्नी' या फिल्मनंतर मी पहिली फियाट गाडी घेतली. त्या पाठोपाठच मी एक टॅक्सीही घेऊन ठेवली. कारण केवळ फिल्मवर मला उपजीविकेसाठी अवलंबून राह्यचं नव्हतं. तेवढा आत्मविश्वासही नव्हता. याही काळात आम्ही भुलेश्वरला एका चाळीतच दोन खोल्यांच्या घरात राहत होतो. मी स्वयंपाक घरातच झोपत असे आणि स्वयंपाकघरातीलच बाथरूममध्ये आंघोळ करून जो बाहेर पडत असे तो रात्री उशिराच येत असे.

'मी फारसा धार्मिक नाही याबद्दल माझी आई नेहमी कुरकुरत असते. पण मी तिला सांगतो–हे माझं दुर्दैव आहे. बऱ्याच लोकांना अडचणीच्या, संकटाच्या काळात देवाकडे वळावंसं वाटतं, त्यातून त्यांना मनःशांतीदेखील मिळते. मला तसं काहीच वाटत नाही.

'शेवटी मी एवढंच सांगू शकेन की यशाचा स्वीकार करणं त्या मानाने सोपं असतं. पण जीवनात अनेक प्रकारचे पराभव स्वीकारूनही हसरा चेहरा ठेवणं अतिशय अवघड आहे. हारल्यावरही पुन्हा लढण्याची जिद्द असणं महत्त्वाचं आहे.'